सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २९ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गौतम अदानींना दिलासा! अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणात मिळाली क्लीन चिट

नवी दिल्ली : भारताचे दिग्गज उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकन न्यायालयाने लाचखोरी प्रकरणाबाबत दोषी ठरवले होते. याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून अटक वॉरंट देखील जारी करण्यात आले होते. या प्रकरणामुळे अदानी समुहाला मोठ्या अडचनींचा सामना करावा लागला होता. मात्र आता अमेरिकेत सुरू असलेल्या लाचखोरी प्रकरणात आघाडीचे उद्योगपती अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांची कंपनी अदानी ग्रीन एनर्जीला मोठा दिलासा मिळाला आहे.



अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणाबाबत स्वतंत्र पुनरावलोकनात त्यांच्याविरुद्ध कोणतीही अनियमितता आढळली नसून, अदानी ग्रुपने सर्व आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. याबाबत कंपनीने एक निवेदन जारी केले आहे. त्यानुसार, 'स्वतंत्र चौकशीनंतर अदानी ग्रीन किंवा त्यांच्या सहयोगी कंपन्यांनी कोणत्याही नियमांचे किंवा कायद्यांचे उल्लंघन केले नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्याचबरोबर अदानी कंपनी भविष्यातही सर्व नियम आणि कायदे पाळत राहील', असेही म्हटले आहे.

नेमके प्रकरण काय?

भारतीय वीज प्रकल्पाचा करार मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांना लाच दिल्याचा आरोपाखाली नोव्हेंबर २०२४ मध्ये अमेरिकन अधिकाऱ्यांनी अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदानी, त्यांचा पुतण्या सागर अदानी आणि अदानी ग्रीनचे व्यवस्थापकीय संचालक विनीत एस. जैन यांना अटक केली होती. निधी उभारताना अमेरिकन गुंतवणूकदारांची दिशाभूल केल्याचाही त्यांच्यावर आरोप होता. या आरोपांअंतर्गत, अदानी ग्रुपवर २३६ दशलक्ष डॉलर्सची लाच दिल्याचा आरोप होता. दरम्यान, या प्रकरणाचा अदानी समुहाचे शेअरर्स धडाधड कोसळले असून केनियाने अदानींशी संबंधित प्रकल्प रद्द करण्याची घोषणा केली होती. त्यामुळे अदानी समूहाला मोठा फटका बसला होता.

## पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत -मुख्यमंत्री

मुंबई, २९ एप्रिल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहलगाम हल्ल्यात महाराष्ट्रातील मृत्यूमुखी पडलेल्या ६ मृतांच्या नातेवाईकांना ५० लाखांची मदत जाहीर केली आहे.याशिवाय या कुटुंबांच्या शिक्षण, रोजगाराकडे राज्य सरकार लक्ष देणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. या हल्ल्यात पुण्यातली संतोष जगदाळे यांचा मृत्यू झाला होता, त्यांच्या मुलीला शासकीय नोकरी देण्याचा निर्णय देखील आज (दि.२९) मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीर करण्यात आला आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या आज, मंगळवारी झालेल्या बैठकीमध्ये पहलगाममधील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्रातील



६ मृतांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

याशिवाय या कुटुंबांच्या शिक्षणाची, रोजगाराची हमीदेखील राज्य सरकार घेणार आहे.जगदाळे कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच घोषणा केली होती. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी विशेषाधिकार वापरत संतोष जगदाळेंच्या मुलीला आजच्या बैठकीमध्ये सरकारी नोकरी देण्याचा निर्णय निश्चित केला आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला होता.

## दहशतवादी हाशिम मुसा पाकिस्तानी सैन्याचा कमांडो

श्रीनगर, २९ एप्रिल (हिं.स.) : जम्मू आणि काश्मीरच्या हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांपैकी एकाची ओळख पटवण्यात आली आहे. त्याचे नाव हाशिम मुसा असून तो पाकिस्तानी आहे. तसेच त्याचे पाकिस्तानी लष्कराशी संबंध असल्याची माहिती पुढे आली आहे. दरम्यान भारत सरकारने याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही.

पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या ३ दहशतवाद्यांचे रेखाचित्र जारी करण्यात आले आहे.यापैकी एका पाकिस्तानी दहशतवाद्याची ओळख हाशिम मुसा अशी झाली आहे.

मुसा हा पाकिस्तानी लष्कराच्या विशेष दलाचा माजी पॅरा कमांडो आहे. मुसा आता लष्करसोबत काम करत आहे आणि स्थानिक नसलेल्या आणि सुरक्षा दलांमध्ये दहशत पसरवण्याच्या उद्देशाने त्याला जम्मू आणि काश्मीरमध्ये पाठवण्यात आले होते.

एका अधिकाऱ्याने सांगितले आहे की पाकिस्तानी विशेष दलांनी लष्करला कर्ज दिले आहे. आता लष्कर-ए-तैयबासोबत काम करणाऱ्या हाशिम मुसाला जम्मू आणि काश्मीरमध्ये पाठवण्यापूर्वी पाकिस्तानच्या विशेष सेवा गटाने (एसएसजी) विशेष प्रशिक्षण दिले होते.तपासकर्त्यांचे म्हणणे आहे की मुसावर भारतीय आणि परदेशी पर्यटक तसेच सुरक्षा कर्मचाऱ्यांसह स्थानिक नसलेल्या नागरिकांना लक्ष्य करण्याचे काम सोपवण्यात आले होते.

## अक्षय्य तृतीयाच्या मुहूर्तावर हापूस आंबा झाला स्वस्त

पुणे : साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयाच्या मुहूर्तांवर मार्केटयार्डात मोठ्या प्रमाणात हापूस आंबा उपलब्ध झाला आहे. अक्षय तृतीया चारच दिवस उरल्यामुळे बुधवारी (दि. ३०) आहे. यामुळे मार्केटयार्ड फळ बाजारात पणन मंडळ व वखार महामंडळ आधी भागात राज्य पणन महामंडळाच्या वतीने शेतकऱ्यांचा थेट माल ग्राहकापर्यंत पोहोचविण्याची सुविधा उपलब्ध केल्याने मार्केटयार्ड परिसरात आंबा खरेदीसाठी ग्राहकाकडून गर्दी होत आहे. बाजारात आंब्याची आवक ही वाढल्याने दरही सामान्यांच्या आवाक्यात आहेत. बाजारात ४०० रुपयांपासून ते ८०० रुपये डझनापर्यंतचा आंबा उपलब्ध आहे.

## पाकिस्तानी हॅकर्सचा भारतावर सायबर अटॅक

### राजस्तान सरकारच्या ३ वेबसाईटला केले टार्गेट

जयपूर, २९ एप्रिल : पाकिस्तानी हॅकर्सनी राजस्थान सरकारच्या तीन वेबसाइटना लक्ष्य केले आहे आणि त्यावर भारतविरोधी संदेश पोस्ट केले आहेत. पाकिस्तानी सायबर गुन्हेगारांनी राज्यातील अनेक सरकारी वेबसाइटना लक्ष्य केले आहे, ज्यामध्ये शिक्षण विभागाचे अधिकृत पोर्टल देखील टार्गेट केले आहे.

राजस्थानचे शिक्षण मंत्री मदन दिलावर यांनी मंगळवारी या घटनेची दखल घेतली आणि विभागाची माहिती तंत्रज्ञान शाखा सक्रिय केली. हॅक केलेली वेबसाइट रिकव्हरी ऑपरेशन्स सुरू असताना तात्पुरती बंद करण्यात आली आहे. सायबर सुरक्षा एजन्सींना देखील माहिती देण्यात आली आहे. जबाबदार हॅकिंग गट ओळखण्यासाठी आणि कोणत्याही संभाव्य डेटा उल्लंघनाचे मूल्यांकन करण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. अद्याप कोणताही संवेदनशील डेटा लीक झाल्याची माहिती नाही. परंतु खबरदारीचा उपाय म्हणून सर्व विभागीय प्रणालींचे व्यापक ऑडिट सुरू आहे. सोमवारी झालेल्या अशाच सायबर हल्ल्यानंतर ही घटना घडली आहे ज्यामध्ये हॅकर्सनी स्थानिक स्वराज्य संस्था (डीएलबी) आणि जयपूर विकास प्राधिकरणाच्या (जेडीए) वेबसाइटवर हल्ला केला आणि त्यावर पाकिस्तान समर्थक प्रचार साहित्य पोस्ट केले. त्या दोन्ही वेबसाइट आता पुनर्संचयित करण्यात आल्या आहेत.एका पोस्टमध्ये, 'पाकिस्तान सायबर फोर्स'चा भाग असल्याचा दावा करणाऱ्या हॅकर्सनी पहलगाममधील अलीकडील दहशतवादी घटनेचा हवाला देऊन भारताबद्दल चिथावणीखोर टिप्पण्या केल्या आहेत.

शिक्षणमंत्र्यांनी आश्वासन दिले की शिक्षण विभागाची वेबसाइट लवकरच पूर्ववत केली जाईल. भविष्यात होणारे उल्लंघन रोखण्यासाठी सायबर सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जातील असे त्यांनी सांगितले.

## काँग्रेसकडून इंस्टाग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट

नवी दिल्ली, २९ एप्रिल : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, आपल्या आमदारांच्या वादग्रस्त विधानांनी वेढलेल्या काँग्रेसने एक नवीन पोस्ट केली आहे. काँग्रेसने इंस्टाग्रामवरील एका फोटोसह पोस्टमध्ये लिहिले आहे की जबाबदारीच्या वेळी बेपत्ता. चेहरा नसलेल्या चित्रात, डोक्याच्या जागी बेपत्ता हा शब्द लिहिलेला आहे. काँग्रेसच्या या पोस्टनंतर राजकीय वर्तुळात बरीच चर्चा सुरू आहे. चित्रात कोणाचेही नाव नसले तरी, या पोस्टचे राजकीय संदर्भ लक्षात घेऊन भाजपने पोस्टला प्रत्युत्तर दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्वपक्षीय बैठकीला उपस्थित न राहिल्याबद्दल काँग्रेस आक्रमक आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सोमवारी जयपूरमध्ये या संदर्भात पंतप्रधान मोदींवर टीका केली होती. जेव्हा देशाच्या अभिमानावर हल्ला झाला तेव्हा पंतप्रधान बिहारमध्ये निवडणुकीचे भाषण देत होते. सर्व पक्षांचे नेते बैठकीला आले, पण पंतप्रधान आले नाहीत. बिहार खूप दूर होता का ? त्यांनी येऊन योजनेबद्दल आणि त्यांना आमच्याकडून कोणत्या प्रकारची मदत हवी आहे हे सांगायला हवे होते असे खर्गे म्हणाले होते. त्यानंतर आज, मंगळवारी काँग्रेसने इंस्टाग्रामवर एक डोके नसलेला फोटो पोस्ट केला. जबाबदारीच्या वेळी बेपत्ता असल्याचे लिहिले होते. पोस्टमध्ये समाविष्ट असलेल्या फोटोमध्ये डोके नसलेला मृतदेह दिसतो. डोके असलेल्या जागेवर गहाळ असे लिहिले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

भाजपने काँग्रेसच्या पोस्टवर प्रत्युत्तर दिले आहे. भाजप नेते अमित मालवीय म्हणाले की, काँग्रेसने कापलेल्या डोक्याच्या प्रतिमेचा वापर करून कोणताही संशय सोडला नाही. हे केवळ राजकीय विधान नाही. मुस्लिम मतपेढीला आणि पंतप्रधानांविरुद्ध लक्ष्य करण्यासाठी ही छुपी चिथावणी आहे. काँग्रेसने अशी रणनीती अवलंबण्याची ही पहिलीच वेळ नाही. राहुल गांधींनी अनेक वेळा पंतप्रधानांविरुद्ध हिंसाचार भडकावला आहे. तरीही काँग्रेस कधीही यशस्वी होणार नाही, कारण पंतप्रधानांना लाखो भारतीयांचे प्रेम आणि आशीर्वाद आहेत.

जर कोणाची मान कापली गेली तर ती काँग्रेस आहे - जी आता दिशाहीन डोके नसलेल्या हायड्रामध्ये संकुचित झाली आहे. यासंदर्भातील आणखी एका पोस्टमध्ये अमित मालवीय म्हणाले की, काँग्रेस नेते पाकिस्तानच्या स्लीपर सेलसारखे काम करत आहेत. त्यांची बेजबाबदार आणि निंदनीय विधाने पहा. ते मृत्यूमध्ये पीडितांच्या कुटुंबियांनाही सन्मान नाकारत आहेत. हत्येचे साक्षीदार आणि प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यांकडून मिळालेले पुरावे असूनही, काँग्रेस शहामृगाप्रमाणे वाळूत डोके लपवत असल्याचा टोला मालवीय यांनी लगावला.

## गुजरातच्या बांगलादेशींच्या अवैध वस्तीवर बुलडोझर ॲक्शन



अहमदाबाद, २९ एप्रिल : पहलगाम हल्ल्यानंतर गुजरातमध्ये अवैध निर्वासितांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. अलिकडेच गुजरातच्या सुरत आणि अहमदाबाद येथून १००० हून अधिक बांगलादेशी नागरिकांना अटक केली होती. आता पोलिसांनी चांडोला तलावाजवळ बांधलेल्या बांगलादेशी वस्तीवर छापा टाकला आहे. याठिकाणी ८०० जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या अवैध वस्तीवर बुलडोझर कारवाई करण्यात आली.

चांडोला तलाव परिसरात बुलडोझर चालवण्यापूर्वी पोलिसांनी या संपूर्ण परिसरातील वीज तोडली. त्यानंतर ५० जेसीबी मशीन आणि ३० एमएमसी डंपर बोलावण्यात आले. यालेशी २ हजारांहून अधिक पोलिस घटनास्थळी उपस्थित होते. वस्तीवरील कारवाईदरम्यान ८०० संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे, त्यापैकी १४३ बांगलादेशी नागरिक असल्याचे आढळून आले आहे.

बांगलादेशी वस्तीविरुद्ध कारवाई करताना पोलिसांनी संपूर्ण परिसरात १० हून अधिक ड्रोन तैनात केले होते, ज्याद्वारे संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवले जात होते. लल्ला बिहारी यांच्या फार्महाऊसचा एक दरवाजा होता, जो पोलिसांनी फार्महाऊसमध्ये प्रवेश करण्यासाठी तोडला. एमएमसीच्या पथकाने हातोड्याने फार्महाऊस पाडले. यासंदर्भात माहिती देताना पोलिस अधिकारी शरद सिंघल म्हणाले की, चांडोला तलावाभोवती बांगलादेशींची बेकायदेशीर वस्ती होती. ती २००९ मध्ये आधीच पाडण्यात आली आहे. परंतु, या लोकांनी पुन्हा येथे वस्ती केली. एएमसीच्या ताज्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की या लोकांनी तलावाच्या सरकारी जमिनीवर माती टाकून झोपड्या बांधल्या आहेत. ही कारवाई एएमसी स्वतः करत आहे. कारवाईदरम्यान परिसरात कायदा आणि सुव्यवस्था राखली जाईल आणि जीवितहानी होण्याची कोणतीही परिस्थिती उद्भवणार नाही याची खात्री पोलिस करत आहेत.



# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## यूपीएससी परीक्षेत कोदळीचा कृष्णा पाटील उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ एप्रिल -**



कोदळी येथील कृष्णा बब्रुवान पाटील या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलाने अगदी दुसऱ्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षेत १९७ रँक मिळवत उत्तीर्ण होऊन कोदळी या गावचाच नसून अख्या लातूर जिल्ह्याचा सन्मान होईल, असे कर्तृत्व करून दाखवलेले आहे.

लहानपणी शिक्षण चालू असतानाच वडिलांचे छत्र हरवले. अतिशय अल्प आजारामध्ये वडिलांचे निधन झाले. केवळ आई सुवर्णा बब्रुवान पाटील आणि आजोबा व्यंकटराव पाटील कोदळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कृष्णा पाटील यांना अशा प्रकारचे यश मिळवता आलेले आहे. तर कृष्णा पाटील यांची बहीण कावेरी पाटील वैद्यकीय क्षेत्रात एमडी होण्याच्या मार्गावर आहेत. तर दोन्ही बहिण भाऊ अतिशय मेहनत घेऊन अभ्यास करून अशा प्रकारचे दैदिप्यमान यश यांना प्राप्त करता आलेले आहे. इतर प्रयत्नवादी विद्यार्थ्यांसाठी हे खूप मोठे कौतुकास्पद उदाहरण म्हणून वापरता येण्याजोगे आहे.

कृष्णा पाटील यांनी अशा प्रकारचे यश मिळवल्यामुळे गावच्या व लातूर जिल्ह्याच्या परिसरातील राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी कृष्णा पाटील यांची भेट घेऊन सत्कार करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त...



### औशात पेहलगाम घटनेच्या निषेधार्थ आक्रोश मोर्चा

**औसा, दि.२८ एप्रिल -**

कश्मिर येथील पेहलगाम येथे दहशतवाद्यांकडून निष्पाप हिंदू बांधवांवर गोळ्या झाडून हत्या केल्याच्या निषेधार्थ हनुमान चालीसा पाठाचे पठण करीत औसा शहरातील किल्ले मैदानापासून हनुमान मंदीरापर्यंत सकल हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी पाकिस्तानी विरोधात घोषणाबाजी करून घटनेचा निषेध नोंदविण्यात आला. औसा तालुका सकल हिंदू धर्माच्या वतीने हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात शहरासह तालुक्यातील हिंदू बांधवानी मोर्चात सहभाग घेतला. किल्लेमैदानापासून गांधी चौकातून मोर्चा हनुमान मंदिर येथे दाखल झाला. यावेळी हजारो हिंदू बांधवांनी एकमुखाने हनुमान चालीसा पठण करीत एकजुट दाखविली. या चौकात पाकिस्तानी ध्वज जाळून आपला रोष व्यक्त केला. पाकिस्तान विरोधी घोषणाबाजीने परिसर दणाणून निघाला होता. तसेच या आक्रोश मोर्चात किल्ला मैदानापासूनच आमदार अभिमन्यू पवार सहभागी होत पेहलगाम घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली.

### डॉ. जनार्धन वाघमारे यांची निवड

**चाकूर, दि.२८ एप्रिल -**

चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. जनार्धन केशव वाघमारे



यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भुगोल अभ्यास मंडळावर निवड झाली असून डॉ. जनार्धन वाघमारे यांचे राष्ट्रीय स्तरावर ९४ शोधनिबंध, ५ ग्रंथ तसेच पीएचडी संशोधन करणाऱ्या ७ विद्यार्थ्यांचे ते संशोधक मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनात २ विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी प्राप्त केलीली आहे. डॉ. वाघमारे यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सिमा देशमुख, उपाध्यक्ष आबासाहेब देशमुख, सचिव पी.डी. कदम, सहसचिव बाबासाहेब देशमुख, प्राचार्य सर्जेराव शिंदे यांच्यासह संस्थेचे कर्मचारी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



### गोरोबा काका यांची पुण्यतिथी साजरी

**निलंगा, दि.२८ एप्रिल -**

संत शिरोमणी गोरोबा काका यांची पुण्यतिथी कुंभार गल्ली, दापका वेस येथे साजरी करण्यात आली. यावेळी हभप. भुजंग पांचाळ महाराज यांचे किर्तन आयोजीत केले होते. त्यांनी संत गोरोबा काका यांचे जीवन व चरित्र सांगितले. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला, पुरुष उपस्थित होते. यावेळी दत्ता मोहोळकर, रवि मोहोळकर, सुधाकर मोहोळकर, पद्माकर मोहोळकर, किशोर मोहोळकर, विक्रम मोहोळकर, गणपत मोहोळकर, युवराज मोहोळकर, ॲड. रमेश मोहोळकर, प्रसाद मोहोळकर, गोपाळ मोहोळकर, सोमनाथ मोहोळकर, राजू मोहोळकर, मनोज मोहोळकर, संतोष मोहोळकर, लक्ष्मण मोहोळकर, नागनाथ मोहोळकर, बालाजी मोहोळकर, माधव मोहोळकर, श्रीराम कुंभार, गोविंद मोहोळकर, गुरुनाथ मोहोळकर, प्रवीण मोहोळकर, दत्ता कुंभार, संजय कुंभार, गणेश कुंभार, पृथ्वीराज निंबाळकर, राणा आर्य, परीक्षित राजमल्ले, परमेश्वर पाटील, आदित्य कमले इत्यादी उपस्थित होते.



### व्यंकट साबणे यांचा सत्कार

**उदगीर, दि.२८ एप्रिल -**

हिंदू खाटीक समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते हे गेल्या अनेक वर्षापासून शिवसेनेत कार्यरत असून त्यांनी उदगीरमध्ये शिवसेना पक्ष वाढवण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या कार्याची दखल घेऊन उबाठा पक्षाच्या वतीने तालुका समन्वयक पदी निवड करण्यात आली. हिंदू खाटीक समाज उदगीरच्या वतीने अध्यक्ष ॲड. मंगेश साबणे व महादेव घोणे यांनी साबणे यांचा शाल, पुष्पहाराने सत्कार केला.

### महात्मा बसवेश्वरमध्ये व्याख्याने आयोजन

**लातूर, दि.२८ एप्रिल -**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती महोत्सवानिमित्त विशेष व्याख्यान आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था नूतन कार्यकारणी वर्षपूर्ती निमित्त अभिष्टचिंतन सोहळा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र आणि कामगार दिनाचे औचित्त साधून गुरुवार दि.१ मे रोजी ५.४५ वा. विज्ञान इमारतीसमोरील खुल्या सभागृहामध्ये आयोजित केला आहे.

# शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफ करण्यासाठी तहसील कार्यालयावर धडक मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२८ एप्रिल -**



भाजप प्रणित सरकारने सत्तेत बसण्यासाठी वचनामा जाहीर केला होता. त्या जाहीरनामाची सरसकट अंमलबजावणी करण्यासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले होते. व लाडक्या बहिणींना २१०० रुपये अनुदान देण्याची जाहीर केले होते. शेतातील व घरगुती वीज बिल माफ करावे, शेतकऱ्यांनी बँकेचे घेतलेले कर्ज माफ करण्याऐवजी बँकेने कर्जधारक शेतकऱ्यांना त्रास देण्याची काम चालू केले आहे. आज शेतकऱ्यांच्या शेतमालाला कुठल्याही प्रकारचा हमीभाव दिला जात नाही. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. तरी सरसकट शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, त्याबद्दल कर्ज वसुली सक्तीची करण्यात येत असून ती करण्यात येऊ नये. सततच्या कर्ज वसुलीमुळे शेतकऱ्यांना मागे आड, पुढे विहीर अशी अवस्था झाली आहे. त्यामुळे शेतकरी कर्जापोटी आत्महत्या सारखे टोकाचा मार्ग अवलंबित असून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये म्हणून तात्काळ कर्ज वसुली थांबण्यात यावी व कर्जमाफी देण्यात यावी. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्यात यावे. शेतीतील व घरगुती वीज बिल माफ करण्यात यावे. घरकुल बांधकाम करीत असलेल्या लाभार्थ्यांना वाळू मोफत वाटप करण्यात यावी. घरकुलाचे अनुदान त्वरित देण्यात यावे, या मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी यांच्या उपस्थित निवेदन देण्यात आले.

या मागण्या मान्य नाही झाल्या तर तहसील कार्यालय चाकूर समोर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हा समन्वयक प्रकाश हैबतपुर, तालुकाप्रमुख नंदकुमार पवार, अंगद पवार, युवा सेना जिल्हाप्रमुख लक्ष्मण पेठकर, सुभाष गुंडिले, नागेश कोंबडे, राजेंद्र शेवाळे, महादेव नीला, शिंदे गुंडेराम, अदावळे महादेव, बिडवे तुकाराम, बेंद्रे सुधाकर, एरकुंडे बब्रुवान, गौस शेख असलम देशमुख, ज्ञानेश्वर चाटे अनिकेत कांबळे, उपसरपंच श्रीराम शिंदे, प्रदीप शिंदे, अभिमन्यू शिंदे, माधव आदावळे, वसंत शिंदे, शिवकुमार गायकवाड, धोंडीराम वाघमारे, दामवाले धनराज, गोविंद बदके, शिवाजी मतलाकुठे, निळकंठ बिडवे, अनिल पाटोळे आदी उपस्थित होते.

## नीता मोरे व राहुल नेटके आदर्श शिक्षक पुरस्कारांनी सन्मानीत

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ एप्रिल -**

येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील शिक्षिका नीता मोरे व राहुल नेटके यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेकडून जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले. या पुरस्काराचा वितरण सोहळा लातूर येथील दयानंद सभागृहामध्ये पार पडला. पुरस्काराचे वितरण खासदार शिवाजीराव काळगे, उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी, डायट प्राचार्या भागीरथी गिरी, माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांच्याहस्ते करण्यात आले.





नीता मोरे ह्या नवोपक्रमशील, साहित्यिक व विद्यार्थी प्रिय शिक्षिका म्हणून शालेय क्षेत्रात ओळखल्या जातात.

त्यांनी विद्यार्थ्यांना पूरक अशी साहित्य निर्मिती केली व गणितातले वेगवेगळे प्रयोग करुन विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याचे कार्य केले. तसेच विज्ञान शिक्षक राहुल नेटके हे प्रयोगाशील शिक्षक म्हणून ओळखले जातात. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांचा सहभाग, संशोधन प्रयोगशील वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम सातत्याने करीत राहिले. या दोन्ही शिक्षकांचा शिक्षणाक्षेत्रातील अध्यापन अनुभव व वैविध्यपूर्ण अध्यापनाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने या दोघांना आदर्श पुरस्काराने सन्मानित केले.

याबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुणे, शालेय समितीचे अध्यक्ष सतन्पा हुरदळे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले, किरण नेमट व सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## धर्मभेद न करता धर्म स्थापित करणारे परशुराम समजावून सांगणे आवश्यक : राहुल गिरी

**उदगीर येथे परशुराम जन्मोत्सव व्याख्यानमालेने साजरा**

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२८ एप्रिल -**

उदगीर येथील परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने लालबहादूर शास्त्री विद्यालयात आयोजित व्याख्यानमालेत 'आजच्या तरुणाची दशा आणि दिशा' या विषयावर राहुल गिरी यांनी तरुणांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रमोद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमात धर्मभेद न करता धर्मस्थापना करणाऱ्या भगवान परशुरामांचे कार्य तरुणाईसमोर समजावून सांगण्याची गरज असल्याचे राहुल गिरी यांनी अधोरेखित केले.



राहुल गिरी यांनी सांगितले की, परशुरामांनी क्षत्रियांचा विनाश केल्याचे वर्णन झाले असले तरी त्यांचे कार्य धर्मसंवर्धनासाठी होते. परशुराम आणि प्रभू रामचंद्र यांच्यातील संबंधातून पित्याबद्दलचा आदर काय असतो याचे उत्तम उदाहरण तरुणांनी घ्यावे, असेही त्यांनी नमूद केले. आजच्या तरुणाईत राष्ट्रनिर्मितीची स्वप्ने रुजविण्याची गरज असून, संकटांशी सामना कसा करावा याचे संस्कार लहान वयातच व्हायला हवेत, असेही ते म्हणाले.

मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुण भावनाहीन होत असून, काल्पनिक पात्रांच्या मागे लागण्याऐवजी संभाजी महाराजांसारख्या इतिहासातील खऱ्या वीरांचा आदर्श घेणे आवश्यक आहे, असे गिरी यांनी सांगितले. त्यांनी यावेळी पालकांना आवाहन केले की, वेस्ट कंट्रीच्या चुकीच्या प्रभावापासून वाचवत, मुलांच्या मनात भारतीय संस्कृतीची बीजे पेरावी.

राहुल गिरी यांनी राम आणि कृष्णाच्या प्रेमाची सत्यता समजावून देत, प्रेम आणि कर्तव्य यातील समतोल शिकवण्याची गरज स्पष्ट केली. आई-वडिलांच्या पाया न पडणाऱ्या तरुणाईवर त्यांनी तीव्र टीका केली आणि आई-वडिलांवरील प्रेमच खऱ्या इतिहास घडवणाऱ्या व्यक्तिमत्वाची ओळख असल्याचे सांगितले.

व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, सावरकर, महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या विचारांचा पुरस्कार करत आजच्या तरुणांनी त्यांचे आदर्श जीवनात अंगीकारावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीपाद पाटील यांनी, प्रास्ताविक दीपक बल्सुलकर यांनी तर आभार विष्णू कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता गोपाल जोशी यांच्या पसायदानाने झाली. यावेळी महाप्रसादाची व्यवस्था सूरज पोस्त्ये यांच्या वतीने करण्यात आली होती. कार्यक्रमास अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ डॉक्टरांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२८ एप्रिल -**




अहमदपूर तालुक्यातील आयएमए (इंडियन मेडिकल असोसिएशन) आणि एमपीए (मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन), अहमदपूर शाखेच्या वतीने जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करतन २८ एप्रिल रोजी मुकमोर्चा काढून अहमदपूर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

या भ्याड हल्ल्यात निर्दोष नागरिक आणि सुरक्षा दलांच्या जवानांना आपले प्राण गमवावे लागले, जे अत्यंत निंदनीय तर आहेच आणि हा हल्ला केवळ मानवतेवरच नव्हे, तर देशाच्या शांतता आणि एकतेला आव्हान देणारा आहे आशा तीव्र भावना व्यक्त करून हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या हल्ल्यात जखमी झालेल्यांच्या लवकरात लवकर प्रकृती सुधारणेसाठी प्रार्थना करत केंद्र आणि राज्य सरकारला या हल्ल्याच्या मागील सूत्रधारांचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. शहरातील सर्व डॉक्टर्सच्या मार्फत तहसीलदार उज्वला पांगरकर यांच्याकडे पहलगाम हल्ल्याचा निषेध करणारे निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी इंडियन मेडिकल असोसिएशन अहमदपूरचे अध्यक्ष डॉ. मेजर मधुसूदन चेरेकर, डॉ. सतीशचंद्र पेड, डॉ. रामराव बेरळकर, डॉ. आमिर पठाण, डॉ. अब्दुल दाईमी, डॉ. सय्यद असलम, डॉ. सुहास जोशी, डॉ. नरहरी सुरनर, डॉ. संतोष देवकते, डॉ. शशिकांत गुणाले, डॉ. सुनील कच्छवे हे उपस्थित होते.

## अरी गावातील सामाजिक तणाव शमविण्यात भीम आर्मीची महत्त्वपूर्ण भूमिका

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२८ एप्रिल -**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय जागेवर ध्वज रोवण्याच्या घटनेनंतर निर्माण झालेला तणाव भीम आर्मीच्या पुढाकाराने शमविण्यात आला.

या घटनेनंतर महाराष्ट्र राज्य भीम आर्मीचे संस्थापक अध्यक्ष नितीन मोरे, लातूर जिल्हाध्यक्ष माधव गायकवाड, अनिल सूर्यवंशी आणि ॲड. योगेश बरडाळे यांनी गावात भेट देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. त्यांनी दलित व सवर्ण गटातील नागरिकांना समजावून सांगत संघर्ष टाळण्याचे महत्त्व पटवून दिले. संघर्षामुळे विकासात अडथळे निर्माण होतात याची जाणीव दोन्ही गटांना करून दिली.

गावकऱ्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत, भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत अशी ग्वाही दिली. यावेळी गावातील महिलांसह अनेक नागरिक उपस्थित होते. उपसरपंच नारायण पवार आणि विनोद भाऊसाहेब पाटील यांनीही या संवादात सहभाग घेतला.

गावकऱ्यांनी स्पष्ट केले की, अरी गावात जातीय भेदभावाचा प्रश्न नाही. जर भेदभाव असता, तर गावातील तीन किराणा दुकाने जी दलित समाजातील नागरिकांची आहेत. सर्व गावकऱ्यांकडून इतक्या मोठ्या प्रमाणात स्वीकारली गेली नसती.

सवर्ण समुदायालाही कधी स्वतंत्र दुकान सुरू करण्याची गरज वाटली नाही, यावरून गावातील सामाजिक सलोखा स्पष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले.

गावातील नागरिकांच्या एकतेचे आणि समजुतीचे हे उदाहरण सर्वत्र कौतुकास पात्र ठरत आहे.

# अहिल्यादेवी होळकर जनजागृती संदेश यात्रेचा १ मे रोजी चाकूर येथून शुभारंभ

**लातूर जिल्ह्यातील ११२ गावातून जाणार संदेश यात्रा...**

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२८ एप्रिल -**

चाकूर शहरांत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्म महोत्सवी वर्ष विविध समाज उपयोगी व जनजागृतीचे कार्यक्रम, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, गोरगरिब विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके वाटप करून असे समाज उपयोगी कार्यक्रम राबवून जय मल्हार सेनेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जनजागृती संदेश यात्रा जिल्ह्यातील ११२ गावातून काढण्यात येणार आहे.

दि.१ ते ४ मे व ११ ते १७ मे या दोन टप्प्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जनजागृती संदेश यात्रा लातूर जिल्ह्यात विविध गावांमध्ये जाणार आहे. यासाठी गावोगावी या संदेश यात्रेचे मोठ्या उत्साहात व जल्लोषात स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती मल्हार सेनेचे प्रमुख लहू शेवाळे यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली. अहिल्यादेवी होळकर जनजागृती संदेश यात्रेचा शुभारंभ महाराष्ट्राचे माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते होणार असून मुख्य अतिथी म्हणून लातुरचे खा.डॉ. शिवाजीराव काळगे हे उपस्थित राहणार आहेत. चाकूर येथील सोसायटी चौक येथून १ मे रोजी सकाळी १० वा. उद्घाटन होणार असून यावेळी जय मल्हार सेनेचे प्रमुख लहु शेवाळे, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, चाकूरचे नगराध्यक्ष कपिल माकणे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, माधव कोळगावे, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, सभापती निळकंठ मिरकले, खरेदी विक्री संघाचे चेअरमन डॉ. चंद्रप्रकाश नागिमे, चेअरमन गोविंदराव माकणे, मिलिंद महालिंगे, तालुकाध्यक्ष विलासराव पाटील, सिध्देश्वर पवार, शिवाजी काळे, शिवाजी बैनगिरे, नंदकुमार पवार, अरविंद बिराजदार, माजी उपनगराध्यक्ष नितीन रेड्डी, नगरसेवक गंगुबाई गोलावार, शुभांगी



कसबे, सय्यद मुज्जमील, संजय पाटील, वैशाली कांबळे, अभिमन्यू धोंडगे, भागवत फुले, ज्योती स्वामी, हिरकणबाई लाटे, करीम गुळवे, सुजाता रेड्डी, गोदावरी पाटील, सय्यद सायरा बानो, हणमंतराव शेळके, डॉ. भरत हाके, शिरीष रेड्डी, व्यंकटराव चिंते, डॉ. लक्ष्मण कोरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

ही यात्रा जिल्ह्यातील सर्व तालुके व ११२ गावातून प्रवास करणार असून जवळपास २०० ते २५० गावचे नागरिक या यात्रेत सहभागी घेणार आहेत. यात्रेचा समारोप पानगाव, तालूका रेणापुर येथे निमंत्रित पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.




# खुलताबाद येथील मुद व, जलसंधारण विभागातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करा : विरेंद्र वाघ

खुलताबाद प्रतिनिधी : खुलताबाद येथील उपविभागीय जलसाधारण अधिकारी मुद व जलसाधारण उपविभाग, कार्यालयातील . कामासाठी सोमवार दिनांक २८. सोमवार रोजी सकाळी . ११.३० दरम्यान भेट दिली असता उपविभागीय अधिकारी डि.के.लांडगे हे कार्यालयांमध्ये उपस्थित नव्हते . सदरील प्रतिनिधी यांनी त्यांच्या भ्रमणध्वनी वर संपर्क केला असता मी ऑफिसला येऊन गेलो आता वेरूळ येथे साईडवर आहे असे सांगितले. त्यानंतर त्या ठिकाणी सदरील प्रतिनिधी यांनी भेट दिली असता त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. परत भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता मी आता टापरगाव येथे पोहोचलो आहे अशी उडवा उडवीची उत्तर देऊन जर आपल्याला कामाविषयी काही माहिती लागत असल्यास ती त्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडून घ्या असे सांगितले , एक तर ५ , दिवसाचा आठवडा



त्यातही अधिकारी किमान सोमवारी मुख्यालय आपल्या कार्यालयात , कामकाजासाठी थांबणे गरजेचे असतानाही मुद्दामून थांबत नाही त्याबाबत आपल्या कार्यालयात कुठली अधिकृत माहिती ठेवत नाही कार्यालयातील सेवक दर्जाचे कर्मचारी साहेब आत्ता येणार. आहे .साहेब साइटवर गेले अशी माहिती देतात. (. महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद हे नाव बदलून छत्रपती संभाजी नगर या नावाला अधिकृत मंजुरी दिलेली असताना माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती फलक कार्यालयाच्या गेट जवळ लावलेला असून त्यावर जनमाहिती अधिकारी अपिलीय अधिकारी यांचे नाव नसून या अधिकाऱ्याला छत्रपती संभाजी नगर या नावाचे वावडे दिसून येते यावरूनच या अधिकाऱ्याच्या वागण्याचा व शासकीय कामकाजाचा नमुना दिसून येतो. सामाजिक कार्यकर्ते विरेंद्र सिताराम वाघ) याबाबत या कार्यालयातील गलथान कारभाराची चौकशीची मागणी. निवेदनाची प्रत तहसीलदार खुलताबाद यांना भेटून दिली. याबाबत लवकरच,विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांची याबाबत भेट घेऊन निवेदन देणारा असल्याची माहिती, विरेंद्र सिताराम वाघ यांनी सांगितले .

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०५) हिंदू हिंदुत्व हिंदुराष्ट्र

हे सत्य आहे की रा.स्व. संघ ही हिंदू धर्मियांची संघटना आहे. परंतु याचा अर्थ ठ्ड्ड इतर धर्मियांचा द्वेष करतो असा होत नाही. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू, डॉक्टर आंबेडकर यांच्या पुढाकाराने हिंदू कोड बिल संमत झाले होते. आणि त्यात स्पष्ट म्हटले आहे की मुसलमान- ख्रिस्ती - यहूदी आणि पारशी या चार धर्मीयांना सोडून हिंदुस्थानातील बाकी जातीच्या धर्माच्या लोकांसाठी हे बिल केले आहे. आता संघ या हिंदू कोड बिलातील सर्वांना, संघटित करू इच्छितो.

संघाने प्रांतभेद, भाषाभेद, जातीभेद दूर सारून, हिंदू तितका एक मानून, हिंदू संघटित करावा असा विचार केला; तर ते चूक ठरत नाही. संघामुळे हिंदूधर्मीयांची अस्मिता जागृत होते. ती जागृती विरोधकांना खटकण्याचे कारण नाही. भारतातील साऱ्याच सुधारकांनी हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, कुप्रथा, हुंडा पद्धती, बालविवाह, विधवाजीवन, केशवपन, जातीप्रथा या व अशासारख्या अनेक गोष्टींचा धिक्कार केला आहे. हिंदू समाज निर्दोष बनावा हा त्यांचा मानस होता व तो संघाने मानला. पण असे सुधारक इतर धर्मीयांमध्ये का झाले नाहीत. सर्व पुरोगामी सुधारकांनी टिकेसाठी फक्त हिंदू धर्मीयांनाच लक्ष्य का केले. हा माझा प्रश्न आहे त्याचे उत्तर- कुणी देऊ शकत असल्यास जरूर द्यावे, मी वाट पहात आहे. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# मयत महिलेची ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर - सडपातळ बांधा ,चेहरा गोलाकार,केस काळे पांढरे वाढलेले,रंग निमगोरा,पेहराव लाल रंगाचे ब्लाऊज व हिरवे- निळसर ठिपके असलेले लुगडे,पोटावर तीळ उंची १६० से.मी , वय अंदाजे ७० वर्षे असलेली,अनोळखी महिला रेल्वे स्टेशन मुदखेड घच् छज ३७००० चे जवळ मयत झाली आहे. सदरील सदर मयत इसमावर पंचनामा कार्यवाही करून सदर मयत महिलेचे प्रेत सरकारी दवाखाना, विष्णुपुरी नांदेड येथे पी.एम. झाले नंतर सदरच्या प्रेताची ओळख पटविणे येणे करीता प्रेत शितगृहात ठेवण्यात आले असून रेल्वे पोलीस ठाणे, नांदेड अकस्मात मृत्यू नंबर ४३/२०२५ कलम १९४ इछडड ची नोंद करण्यात आली आहे. सदरील वर्णाचे मयत स्त्री कोणाच्या ओळखीची असल्या नांदेड रेल्वे पोलिसांची संपर्क करावा असे आवाहन सहा.पोलीस निरीक्षक विजया मेलफेदेवर,आनंत आघाव, नेम रेल्वे पोलीस स्टेशन, नांदेड यांनी केले आहे.

## ६000+ वंचित मुलांना आणि तरुणांना डिजिटल साक्षरतेमध्ये कौशल्य

मुंबई - तैवानी तंत्रज्ञान ब्रँड एसुसने विद्याच्या सहकार्याने पश्चिम भारतातील दुर्लक्षित भागातील मुले आणि तरुणांसाठी डिजिटल साक्षरता कार्यक्रम सुरू करण्याची घोषणा केली आहे. डिजिटल साक्षरता आणि कौशल्य विकास उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी डिझाइन केलेला हा कार्यक्रम इयत्ता पहिली ते दहावीच्या ६००० हून अधिक विद्यार्थ्यांना तसेच तरुणांना संयुक्त राष्ट्रांच्या डिजिटल साक्षरता फ्रेमवर्कशी जुळवून घेतलेल्या वयानुसार योग्य अभ्यासक्रमाद्वारे परस्परसंवादी आणि प्रकल्प-आधारित शिक्षणाद्वारे आवश्यक कौशल्ये आणि डिजिटल कौशल्ये प्रदान करेल. भागीदारीचा पहिला टप्पा मुंबईत सुरू होईल, त्यानंतर गोवा आणि गुजरातमध्ये. भारतात प्रवेश केल्यापासून, एसुसने देशात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणण्यासाठी वचनबद्धता दर्शविली आहे. विद्यासोबतची भागीदारी ही एसुस इंडियाने भारतातील डिजिटल दरी भरून काढण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## पॅरीमॅच भारतीय रॅप आयकॉनसह एक खास मीट अँड ग्रीट

मुंबई : आघाडीच्या जागतिक गेमिंग प्लॅटफॉर्म पॅरीमॅचने त्यांचे जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर, भारतीय रॅप आयकॉन डिव्हाईन यांच्यासह एक खास भेट-अँड-ग्रीट सत्र आयोजित केले तेव्हा बासचा आवाज कमी झाला, दिवे कमी झाले आणि उत्साह वाढला. मुंबईतील अँटीसोशल स्थळी आयोजित या कार्यक्रमात प्रभावशाली, पॅरीमॅच व्हीआयपी वापरकर्ते आणि माध्यमांचे प्रमुख लोक एकत्र येऊन एका तल्लीन करणाऱ्या, उच्च-ऊर्जेच्या अनुभवासाठी एकत्र आले. ३५ खास पाहुण्यांनी भरलेल्या गर्दीमुळे, वातावरण उत्साही आणि जिव्हाळ्याचे होते. गीतात्मक कथाकथन आणि मुंबईतील रस्त्याच्या मूळ ओळखणाऱ्या डिव्हाईनने ३० मिनिटांच्या मनोरंजक प्रश्नोत्तरांच्या सत्रासाठी केंद्रस्थानी येऊन चाहत्यांना आणि पत्रकारांना कलाकाराच्या मनाचा खोलवर आढावा घेण्यास मदत केली.

## डॉ. रेड्डीज आणि सनोफी हेल्थकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांची भागीदारी

हैदराबाद - वर्ल्ड इम्युनायझेशन वीकच्या निमित्ताने, डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज लिमिटेड (बीएसई: ५००१२४, एनएसई: डीआररेड्डी, एनवायएसई: आरडीवाय, एनएसईआयएफएससी: डीआररेड्डी; पुढे डॉ. रेड्डीज म्हणून उल्लेख) या जागतिक औषधनिर्माता कंपनीने सनोफी हेल्थकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसएचआयपीएल) सोबत आपली धोरणात्मक भागीदारी वाढवली आहे आणि भारतात बेफोर्टस (निर्सिविमॅब) हे नवे औषध सादर करणार आहे. बेफोर्टस मध्ये निर्सिविमॅब हे मोनोक्लोनल अँटीबॉडी असते, जे नवजात बाळांमध्ये आणि त्यांच्या पहिल्या आरएसव्ही हंगामात येणाऱ्या बाळांमध्ये श्वसन सिंशियल व्हायरस (आरएसव्ही) मुळे होणाऱ्या फुफ्फुसाच्या खालच्या भागातील आजार (एलआरटीडी) टाळण्यासाठी वापरले जाते. तसेच, २४ महिन्यांपर्यंतच्या अशा मुलांमध्येही याचा वापर केला जातो, ज्यांना दुसऱ्या आरएसव्ही हंगामातही गंभीर आजार होण्याचा धोका असतो.

## सोनी मॅक्स १ लॉन्च हिंदी चित्रपटांची सृष्टी अधिक व्यापक

सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया ने सोनी मॅक्स १ वाहिनी लॉन्च करून हिंदी चित्रपट प्रसारण क्षेत्रातील आपली उपस्थिती आणखी व्यापक केली आहे. ही नवी वाहिनी देशभरातील लिनियर टीव्ही प्रेक्षकांसाठी सिनेमॅटिक अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डिझाईन करण्यात आली आहे. 'फिल्मों का ऐसा चस्का, जो देखे हक्का बक्का' असे या ब्रँडचे वचन सोबत घेऊन ही वाहिनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारे आणि त्यांचे मनोरंजन करणारे चित्रपट घेऊन आली आहे. सर्व मोठ्या डीटीएच आणि केबल प्लॅटफॉर्म्स वर १ मे २०२५ पासून लाईव्ह होत असलेली सोनी मॅक्स १ ही वाहिनी हिंदी चित्रपट प्रेमींसाठी सर्वात पसंतीची वाहिनी बनण्यास सज्ज आहे.

## विकास युगातील महाराष्ट्राच्या दिशांचा धांडोळा

एनडीटीव्ही मराठीने आपला पहिला वर्धापन दिन साजरा करतांना एनडीटीव्ही मराठी मंच - हा आयोजित केला होता. राजकीय नेते, धोरणकर्ते, उद्योजक आणि तज्ञांना महाराष्ट्राच्या विकासाच्या मार्गाचा आढावा घेण्यासाठी आणि एकत्रितपणे त्याच्या भविष्याची आखणी करण्यासाठी एकत्र आले. हा कार्यक्रम सरकार, प्रशासन, पायाभूत सुविधा, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरणीय आव्हाने, उद्योजकता आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयांवर संवाद साधण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ ठरला.

## नथिंगच्या या सबब्रँडने तीन एअरबड्ससह स्मार्टफोन सादर

छत्रपती संभाजीनगर - नथिंग या लंडनस्थित टेक्नॉलॉजी कंपनीच्या सीएमएफ या सबब्रँडने आज चार नव्या उत्पादनांची घोषणा केली. या ब्रँडतर्फे सीएमएफ फोन २ प्रो, बड्स २, बड्स २ प्लस आणि बड्स २ए ही उत्पादने सादर करण्यात आली आहेत. नथिंगने या वर्षाची सुरुवात दमदार केली. काऊंटरपॉईंट रिसर्च क्यू१ २०२५ इंडिया स्मार्टफोन शिपमेंट अहवालानुसार या तिमाहीत हा ब्रँड भारतात सर्वाधिक वेगाने वाढणारा स्मार्टफोन ब्रँड आहे. या काळात ब्रँडने मागील वर्षीच्या तुलनेत लक्षणीय १५६ टक्के वाढ अनुभवली. सलग पाचव्या तिमाहीत नथिंगने सर्वाधिक वेगाने वाढणारा ब्रँड हे आपले स्थान कायम राखले आहे. या यशामुळे नथिंग हा भारतीय बाजारपेठेत मागील दशकभरात हे यश गाठणारा एकमेव ब्रँड ठरला आहे.

# इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश

छत्रपती संभाजीनगर, दि.२९(जिमाका) -छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व लातूर या जिल्ह्यात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमातीच्या मुला, मुलींना इयत्ता १ ली मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ देऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत असावी. विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर त्यासंबंधित छायांकित प्रत व दारिद्र्य रेषा अनुक्रमांक नमुद करावा. पालकाची उत्पन्न मर्यादा ही एक लाख रुपये एवढी असून यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा व वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदीम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थ्याचे पालक शासकीय, निमशासकीय नोकरदार नसावेत.

# चारचाकी वाहनात आढळून आला कुजलेल्या अवस्थेत मृतदेह

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.२९ - तालुक्यातील लोहगाव येथील पाच दिवसापासून बेपत्ता असलेल्या ३७ वर्षीय मक्याच्या व्यापाऱ्यांचा मृतदेह सिल्लोड तालुक्यातील घाटनांद्रा घाटातील दरीत स्वतःच्या फोर व्हिलर गाडीत कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. अर्जुन महादू गवळी असे मृत व्यापाऱ्याचे नाव आहे.

लोहगाव येथील अर्जुन महादू गवळी याचा मक्याचा खरेदी विक्रीचा व्यवसाय होता.त्यांचे चिंचोली लिंबाजी येथील मार्केट यार्ड मध्ये गवळी ट्रेडिंग कंपनी नावाचे दुकान आहे.२५ एप्रिल रोजी ते लोहगाव येथून त्यांच्या स्वतः च्या फोर व्हिलर एम.एच २० एच.बी ६६६८ गाडीने चिंचोली लिंबाजी येथे गेले होते.मात्र रात्रीं उशिरा पर्यंत ते घरी परतलेच नाहीत. कुटुंबीयांनी त्यांचा नातेवाईक व इतरत्र शोध घेतला मात्र ते मिळून आले नाही.त्यामुळे २६ एप्रिल रोजी सदरील व्यापाऱ्याचे मोठे भाऊ लक्ष्मण महादू गवळी यांनी अर्जुन गवळी हे बेपता असल्याची तक्रार पिशोर पोलीस ठाण्यात दाखल केली होती. सोमवारी



घाटनांद्रा येथील एका तरुणाने घाटनांद्रा - तिडका रस्त्यावर असलेल्या घाटनांद्रा घाटातील रस्त्याला लागून असलेल्या खोल दरीत उडी घेऊन आत्महत्या केली होती. सदरील तरुणाचा मृतदेह बाहेर काढत असताना खाली खोल दरीत चार चाकी गाडी पडलेली असल्याचे काही स्थानिक लोकांना दिसून आले.त्यामुळे या घटनेचा उलगडा झाला.याविषयी पिशोर पोलिसांना माहिती मिळताच पिशोर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी नागवे ,बीट अंमलदार लालचंद नागलोत ,कौतिक सपकाळ आदींनी घटनास्थळी धाव घेत स्थानिक तरुणांच्या मदतीने दुपारी मृतदेह बाहेर काढला गाडीचा अक्षरशः चेंदामेंदा झाल्यामुळे गाडीचे दरवाजे उघडत नव्हते. त्यामुळे दरवाजे तोडून मृतदेह बाहेर काढण्यात आला. २५ एप्रिल रोजीच हा अपघात घडला असावा त्यामुळेच मृतदेह कुजलेला होता..बॉडी कुजलेली असल्याने जागेवरच शवविच्छेदन करून सायंकाळी लोहगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई,दोन भाऊ,एक बहिण,पत्नी,एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# माहूर ते गंगापूर बस सुरु; परिसरातील प्रवाशांना लाभ

तभा वृत्तसेवा

गंगापूर : माहूर आगाराने माहुरगड ते गंगापूर अशा दोन बसेस दि.२९ पासून सुरु करण्यात आलेल्या आहे. नांदेड विभागातील माहुर आगारास नवीन इतख बसेस प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार माहुर आगाराने माहुर ते गंगापूर बस पुसद, कळमनुरी, हिंगोली, औढा, जिंतूर, मंठा, जालना, छत्रपती संभाजीनगर मार्गे सुरु केली आहे. पहिली माहुर बस माहुर येथून सकाळी ६:३० व दुसरी बस सकाळी ९:३०



वाजता निघून वरील मार्गे सायंकाळी ५:०० वाजता व दुसरी ८:०० वाजता गंगापूर मुक्कामी पोहचेल. परतीच्या प्रवासात पहिली बस गंगापूर येथून सकाळी ५:०० वाजता व दुसरी बस सकाळी ८:०० वाजता निघेल. माहुर आगाराने सुरु केलेल्या या बसेसचा गंगापूर तालुक्यातील व परिसरातील प्रवाश्यांना देवी रेणुकामाता, माहुरगड येथे दर्शनास जाण्यास लाभ होणार आहे. अशी माहिती गंगापूर आगारप्रमुख श्री.विजय बोरसे, सहाय्यक वाहतुक अधिकारी श्री.भापकर, श्री.बागुल, श्रीमती जारवाल यांनी दिली आहे.

## जि. प. केंद्रीय प्रा. शा. सोयगाव केंद्रांतर्गत महाराष्ट्र राज्य परिक्षा-२०२५ शिष्यवृत्ती परिक्षेत विद्यार्थ्यांना यश

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ एप्रिल

येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव केंद्रांतर्गत महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत फेब्रुवारी-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ४३ विद्यार्थ्यांनी आवेदन पत्र भरलेले होते. त्या पैकी ३८ विद्यार्थी परीक्षेत उपस्थित होते.३८ विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत. शाळेचा एकूण निकाल ८४ टक्के लागलेला



वेदांत शरद पवार मिळालेले गुण २१८ | सुरज राजू कुडके मिळालेले गुण २००

आहे.या बत्तीस विद्यार्थांनी पाच विद्यार्थ्यी टॉपर ठरले असुन त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शाळेतून अनुक्रमे वेदांत शरद पवार २१८,निकिता विष्णू बावस्कर २०४,सायली अण्णा वाघ २०२,सुरज गणेश जोहरे २०२, व सुरेश राजू कुडके २०० यांना वरील प्रमाणे गुण प्राप्त झाले आहेत.या पाच विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव उचावल्याचा मान मिळाला आहे.तर या विद्यार्थी-विद्यार्थिनी पात्र झाल्याबद्दल शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख फर्दापूर केंद्र मोती जोहरे,शाळेचे मुख्याध्यापक झगाजी पोतरे,संगीता सोनवणे,सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ,पर्वताबाई भिसे,पुनम कल्याणकर,सय्यद शब्बीर,प्रशांत पाटील,रवींद्र तायडे,अनिल देसाई,तानाजी चव्हाण,विखार शेख,बिलाल बागवान,यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या घवघवीत यश मिळविल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

# एमजीएमच्या वरद, इरा आणि डॉ. श्रीनिवास यांचे जलतरण स्पर्धेमध्ये यश

### एमजीएम विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे जलतरण स्पर्धेत दैदिप्यमान यश

छत्रपती संभाजीनगर, दि.२९: शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटना आणि ऑरझुव फिटनेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महा स्विम चॅम्पियनशिप २०२५' स्पर्धेमध्ये एमजीएम विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आणि स्पोर्ट्स क्लबच्या जलतरणपटूंनी उज्वल यश संपादन केले आहे.

एमजीएम विद्यापीठाचा विद्यार्थी वरद गावंडे आणि एमजीएम स्पोर्ट्स क्लबची जलतरणपटू इरा पंडित यांनी ५० मीटर फ्रीस्टाइल आणि १०० मीटर फ्रीस्टाइल या प्रकारांत प्रत्येकी दोन सुवर्ण पदके पटकावत स्पर्धेत उत्तम कामगिरी केले. या स्पर्धेत वरद आणि इरा यांनी उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेचे लक्ष वेधून घेतले. याच स्पर्धेत एमजीएम विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे





सहाय्यक प्राध्यापक डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात सुवर्ण पदक आणि ५० मीटर बायफिन्स प्रकारात कांस्य पदक जिंकले. डॉ.मोतीयेळे यांनी यापूर्वीही स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत मास्टर्स राष्ट्रीय जलतरण स्पर्धा आणि विविध ओपन वॉटर सागरी जलतरण स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून आपली क्षमता सिद्ध केली आहे.

वरद गावंडे याने याआधीही अनेक जलतरण स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे तसेच तो साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धांमध्ये एमजीएम विद्यापीठाचे प्रतिनिधित्वही करतो आहे. इरा पंडित ही देखील एक अनुभवी जलतरणपटू असून तिने विविध राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या विजेत्या खेळाडूंना अजय भोजने आणि आनंद राजहंस यांचे तर डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांना ट्रायथलॉनचे आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी अभय देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी कामगिरीबद्दल सर्व विजेत्या जलतरणपटूंचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. दिनेश वंजारे, डॉ.शशिकांत सिंग, डॉ.सदाशिव जवेरी, जॉय थॉमस, प्रवीण शिंदे, रहीम खान, निलेश खरे व स्विमिंग असोसिएशन ऑफ छत्रपती संभाजीनगरचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# नगर अर्बनच्या आणखी चार शाखा बंद

### दैनंदिन खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने निर्णय

अहमदनगर : रिझर्व बँकेने नगर अर्बन बँकेचा व्यवसाय परवाना रद्द केल्यानंतर अवसायनात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या आणखी चार शाखा २३ मे पासून बंद करण्यात येणार आहेत. दैनंदिन खर्चात बचत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. बंद होणाऱ्या शाखांमध्ये संगमनेर, बेलापूर, नगर मार्केट यार्ड व केडगाव (इंडस्ट्रीयल इस्टेट) या चार शाखांचा समावेश असून या सर्व शाखांचे कामकाज नगर - मुख्य शाखेतून होणार आहे.

बंद होणाऱ्या शाखांमधील खातेदार लॉकर धारकांनी आपल्या लॉकर मधील वस्तू काढून घेऊन लॉकरच्या चाव्या बँक प्रशासनाकडे सुपूर्द कराव्यात असे आवाहन देखील बँक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यापूर्वीही काही शाखा बंद करण्यात आल्या आहेत.

बँकेतील सर्व ठेवीदारांचे पैसे सुरक्षित असून डी आय सी जी सी व केंद्रीय निबंधक नवी दिल्ली यांच्या नियमानुसार व आदेशानुसार वितरण करण्याची प्रक्रिया सुरू असून सर्व ठेवीदारांनी केवायसीची पूर्तता करून आपले क्लेम फॉर्म नजीकच्या शाखेमध्ये लवकरात लवकर भरून द्यावेत असे आवाहन अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

# संस्कार भारतीच्या नूतन महानगर समितीची घोषणा

### अध्यक्षपदी माधुरी धोंड सचिवपदी सचिन नेवपूरकर

छ.संभाजीनगर,दि२७ (प्रतिनिधी) संस्कार भारतीची बैठक दत्ताजी भाले रक्तपेढीच्या सभागृहात आज संपन्न झाली,यावेळी महानगर समितीची घोषणा करण्यात आली. अध्यक्ष-सौ माधुरी धोंड. सचिव-सुजीत नेवपूरकर. कोषाध्यक्ष-ज्ञानेश्वर पाटील मंचीय कला संयोजक-श्रीपाद पदे. मंचीय कला सहसंयोजक-अनुजा पाठक आणि वृषाली चाटोरीकर, दृश्यकला संयोजक-कैलास आडे साहित्य संयोजक-प्रशांत गौतम. लोककला संयोजक- सौ.अनुराधा पिंगळीकर. ही कार्यकारिणी संस्कार भारती देवगिरी प्रांत सहकोषाध्यक्ष अँड. संजय घायाळ यांनी जाहीर केली. या बैठकीला देवगिरी प्रांत उपाध्यक्ष, पं.विश्वनाथ दाशरथे, प्रांत मंत्री श्री शरद दांडगे. प्रांत मंचीय कला संयोजक. डॉ. जयंत शेवतेकर,प्रांत नृत्यकला संयोजक विक्रांत वायकोस, प्रांत दृश्यकला भूअलंकरण संयोजक प्रा.अमीत देशपांडे, प्रांत मंचीय कला नाट्यविधा सह संयोजक गिरीधर पांडे, साहित्य सह संयोजक नारायण पांडव, लोककला सहसंयोजक शेखर भाकरे उपस्थित होते.बैठकीचे प्रास्ताविक अँड. घायाळ यांनी केले. बैठकीला मार्गदर्शन डॉ.जयंत शेवतेकर यांनी केले.बैठकीचा समारोप प्रांत उपाध्यक्ष पं.विश्वनाथ दाशरथे यांनी केला.बैठकीचे सुत्र संचालन नारायण पांडव यांनी केले. या बैठकीला प्रांत पदाधिका-या शिवाय लक्ष्मीकांत धोंड आणि स्थानिक समितीचे कलासाधक उपस्थित होते.

## टापरगाव जवळ नदीपात्रात मृतदेह आढळला

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२९ एप्रिल -सोलापूर धुळे महामार्गावरील टापरगाव जवळील शिवना नदी पात्रातील शिवना टाकळी प्रकल्पाच्या जलाशयात मंगळवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास स्थानिक रहिवाशांना पाण्यावर तरंगताना अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याबाबत कन्नड ग्रामीण पोलिसांना पोलिसांना कळविण्यात आले. कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार, बीट जमादार कैलास करवंदे, पोलिस नाईक देविदास बोरडे, आलापूर पोलिस पाटील शैलेश राजपूत, पोलिस पाटील प्रकाश पवार, पोलिस मित्र संतोष ढोले यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेह पाण्याबाहेर काढून हतनूर प्राथमिक आरोग्य केंद्रात उत्तरीय तपासणीसाठी आणण्यात आला. अनोळखी मृत व्यक्तीच्या अंगात पिवळ्या रंगाचा टी-शर्ट, कॉलर असलेला हाफ बाहयांचा ज्यावर इंग्रजीमध्ये कास्ता पाईप असे लिहिलेले. जांभळ्या रंगाची कॉटन जीन्स पॅन्ट,जांभळ्या रंगाची बनियान आहे. पुढील तपास हतनूर दूरक्षेत्र चे बीट जमादार कैलास करवंदे पुढील तपास करत आहे.

NOTICE

NJ MUTUAL FUND
BUILT ON RULES

**Unaudited Half Yearly Financial Results of the Schemes of NJ Mutual Fund ("the Fund") for the half year ended March 31, 2025**

Investors may note that in accordance with Regulation 59 of the SEBI (Mutual Funds) Regulations, 1996, read with SEBI circulars issued in this regard from time to time, the unaudited half-yearly financial results of the schemes of NJ Mutual Fund for the half year ended March 31, 2025, has been hosted on the website of the Fund i.e www.njmutualfund.com in a user-friendly and downloadable format (spreadsheet) and on the website of Association of Mutual Funds in India ("AMFI") i.e. www.amfiindia.com.

For NJ Asset Management Private Limited
Investment Manager of NJ Mutual Fund
Sd/-
Vineet Nayyar
Director & Chief Executive Officer
(DIN: 10690316)

Date: April 28, 2025
Place: Mumbai

**For further details, please contact:** NJ Asset Management Private Limited (CIN U67100GJ2005PTC046959) **Registered office:** Block no. 601, 3rd floor, C Tower, Udhna Udyognagar Sangh Commercial Complex, Central Road No.10, Udhna. Surat - 394210. Gujarat. Telephone Number – 0261 6715601. **Corporate office:** Unit no. 101A, 1st floor, Hallmark Business Plaza, Bandra (East). Mumbai – 400051. Telephone number: 022 68940000 /1860 500 2888 / 040-49763510. **Email id:** customercare@njmutualfund.com **Website:** www.njmutualfund.com

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

## अग्रलेख...

# 'टेरर' आणि 'ट्रीटी'ची फारकत!

पाक पुरस्कृत आणि प्रशिक्षित दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये क्रूर हल्ला करून पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारताकडून ज्या काही प्रतिक्रिया आणि कृती अपेक्षित होत्या, त्याची सुरुवात सिंधू पाणीवाटप करारास स्थगिती देण्यापासून झाली आणि उभा देश या हल्ल्याच्या विरोधात संतापाने खदखदत असताना काहींना अचानक पाकिस्तानविषयी पुळका सुरू झाला. त्यांच्या मनातील मानवतेचे भ्याड उमाळे अचानक उचंबळून येऊ लागले आणि पाकिस्तानचे पाणी तोडण्याच्या भारताच्या जशास तशा उत्तरामुळे मने पाकिस्तानच्या सहानुभूतीने कळवळू लागली. देशाला आणि पाकिस्तानलादेखील मिळालेल्या स्वातंत्र्यापासूनच्या प्रत्येक दिवशी कोणत्या ना कोणत्या रूपाने पाकिस्तान ही भारताची डोकेदुखी ठरलेली असतानाही भारताने सातत्याने संयम दाखविला, पण ते भारताचे दुबळेपण नव्हते. गेल्या दहा वर्षांत संयमाची सीमारेषा ओलांडून भारताने दाखविलेल्या शौर्याचे चटके पाकिस्तानला सोसावे लागले, तेव्हापासून पाकिस्तानविषयी फुकाचा पुळका आलेल्या काही राजकीय, सामाजिक नेत्यांमध्ये, महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे नेते व काँग्रेसच्या वळचणीस राहून सत्तेच्या राजकारणासाठी स्वाभिमानदेखील गहाण टाकणारे शरद पवार यांचाही समावेश आहे. पहलगामच्या हल्ल्यानंतर मोदी सरकारने कठोर भूमिका घेतली. ते जनतेस अपेक्षितही होते आणि साहजिकही होते. कारण दहशतवादाच्या विरोधात शून्य सहनशीलता हे मोदी सरकारने जाहीर केलेले धोरणच आहे. केवळ भारतातच नव्हे, तर ज्या ज्या देशांना दहशतवादाच्या समस्येने ग्रासले आहे आणि त्याची मुळे थेट किंवा अप्रत्यक्षपणे पाकिस्तानात पोहोचलेली आहेत, त्या सर्व देशांनीही शून्य सहनशीलता धोरण अवलंबावे यासाठीदेखील भारत आग्रही आहे. म्हणूनच, पहलगाम हत्याकांडानंतर पाकिस्तानच्या विरोधात कठोर पावले उचलण्याचा मोदी सरकारचा पवित्रा देशाने मान्य केला असून, या मुद्यावर उभा देश सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभा असतानाही, पवार यांच्यासारख्या नेत्यांचे चेहरे मात्र पाकिस्तानच्या काळजीने काळवंडलेले दिसू लागले. भारताने एवढे कठोर पाऊल उचलल्यास पाकिस्तान स्वस्थ बसणार नाही, ही भविष्यवाणी तातडीने उच्चारून पवार यांनी आपल्या काळजीचे प्रदर्शन घडविले, की पाकिस्तानच्या प्रतिक्रियेविषयीचे भय व्यक्त केले, हे स्पष्ट नसले, तरी असे काही घडून पाकिस्तानची कोंडी होण्याची वेळ येऊ नये अशीच त्यांची अपेक्षा असावी हे मात्र स्पष्ट आहे. भारताने कठोर पावले उचलल्याने जळफळाट झालेल्या पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून आता १९७२ चा शिमला करार रद्द करण्याची धमकी दिली आणि आपली भविष्यवाणी खरी ठरल्याचा आनंद पवार यांना लपविता आला नाही. पाकिस्तान गप्प बसणार नाही, तेदेखील काही कृती करतील आणि असे काही पाकिस्तानकडून होणार ही माझी शंका खरी ठरली अशी प्रतिक्रिया पवार यांनी व्यक्त केली आणि सिंधू करारास स्थगिती दिल्याने भारताचेच नुकसान होईल, असाही एक सूर उमटू लागला. एकूणच, ज्या परिस्थितीत भारताने काही कठोर भूमिका घेऊन पाकिस्तानला निर्वाणीचा इशारा दिला आहे, त्यामुळे पाकिस्तानबरोबरच देशातीलही मानवतावादाचा मुखवटा घेतलेल्या अनेकांचे धाबे दणाणले आहे. तसे का व्हावे याचे उत्तर शोधणे अवघड नाही. कारण ते केवळ एका शब्दात दडलेले आहे. मोदीद्वेष या शब्दास आता मात्र, पाकिस्तानच्या पुळक्याची जोड देऊन देशात नवे संभ्रम माजविण्यास सुरुवात झाली आहे.

म्हणूनच, पाकिस्तानची फूस असलेल्या दहशतवाद्यांच्या पहलगाममधील हिंसाचारानंतर प्रथमच देशवासीयांशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केलेली संयत भूमिका प्रशंसनीय ठरते. हा हल्ला म्हणजे आतापर्यंतच्या संयमाचे, सहनशीलतेचे आणि सहिष्णुतेचे सारे बांध तोडून टाकणारा प्रकार असल्याने त्याला सडेतोड उत्तर दिले जाईल, तो घडविणाऱ्यांना आणि त्याला फूस लावणाऱ्या किंवा त्याचे समर्थन करणाऱ्या कोणाचीही आता गय केली जाणार नाही, अशा कणखर शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी रविवारी 'मन की बात' या त्यांच्या नैमित्तिक संवाद कार्यक्रमात सरकारची भूमिका स्पष्ट केली. गेल्या २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात उचललेल्या प्रत्येक पावलामागची कारणमीमांसा त्यातून स्पष्ट होतेच, पण पाकिस्तानमध्ये भारतद्वेषाचा उद्रेक कशामुळे होत असावा याचाही अंदाज बांधता येतो. दहशतवादी हल्ला हा त्याच नैराश्याचा, उद्वेगाचा आणि द्वेषाचा परिणाम आहे, याबद्दल आता सरकारच्या मनात शंका नाही, हेही मोदी यांच्या वक्तव्यातून उघड झाले आहे आणि या उद्वेगाचा उद्रेक का झाला असावा याचे त्यांनी बांधलेले आडाखेदेखील लोकांसमोर आले आहेत. काश्मीरमध्ये मोदी सरकारच्या कारकीर्दीत सुरू झालेले विकासपर्व, त्यातून तेथे निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या नव्या संधी, शैक्षणिक सुविधांचा लाभ घेण्याबाबत लोकांमध्ये रुजत असलेली मानसिकता, भौतिक विकासाचे नवे प्रकल्प, पर्यटनक्षेत्रात दिसू लागलेले उभारीचे दिवस व त्यातून स्थानिकांना मिळालेले आर्थिक स्थैर्य हीच या उद्वेगाची कारणे आहेत, हे सरकारचे मत आहे. असे काही झाले, की स्थैर्याच्या भावनेने आश्वस्त झालेल्या समाजात साहजिकपणे सरकारविषयी सहानुभूती वाढीस लागते आणि सरकारविरोधातील कारवायांतून अस्थिरता माजविण्याच्या प्रयत्नांस झिडकारले जाते. काश्मीरमध्ये अशांतता राहावी आणि त्याचाच फायदा घेऊन तेथील तरुणांची माथी भडकावत देशविरोधी कारवायांत त्यांना सहभागी करून घ्यावे ही पाकपुरस्कृत दहशतवादाची जुनी नीती आता फारशी कामी येणार नाही, ही या उद्वेगामगची कारणे आहेत आणि त्यातूनच हा हल्ला घडला आहे. या हल्ल्याची झळ पोहोचलेल्या प्रत्येकास न्याय मिळेल असा प्रखर विश्वास व्यक्त करताना मोदी यांनी कोणत्याही धर्म, पंथ, जात किंवा सामाजिक गटांविषयी देशातील जनतेत किंतु निर्माण होणार नाही याची संयत खबरदारी घेऊन समाजात पसरू पाहणाऱ्या भेदाची दरी बुजविण्याचाही प्रयत्न केला ही बाब जाणीवपूर्वक ध्यानात घ्यावयास हवी.

पहलगाम हल्ल्यानंतरच्या भारताच्या निर्णयांना उत्तर देण्यासाठी पाकिस्ताननेही काही पावले उचलली. केवळ शरद पवार यांनाच नव्हे, तर प्रत्येकासच ते अपेक्षित होते. पण त्यामुळे भयग्रस्त व्हावे अशी स्थिती भारतात निश्चितच नाही. म्हणूनच, ज्या करारांमुळे भारताचेच सातत्याने नुकसान होत गेले आणि पाकिस्तानसाठीच ते फायदेशीर ठरले अशा करारांच्या अटी औपचारिकरीत्या संपुष्टात आणल्यामुळे पाकिस्तानलाच त्याची मोठी किंमत मोजावी लागणार आहे. मुख्य म्हणजे, सिंधू पाणीवाटप करारास स्थगिती देण्याच्या भारताच्या निर्णयास प्रत्युत्तर म्हणून शिमला करार संपुष्टात आणण्याची धमकी पाकिस्तानने भारतास दिली असली, तरी भारताची भूमिका स्वच्छ आहे. 'टेररिझम आणि ट्रीटी' - म्हणजे दहशतवाद आणि करार कधीच एकत्र नांदू शकणार नाहीत. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने शिमला करार रद्द करण्याची धमकी दिल्याने भारतावरील काही राजनैतिक बंधनांच्या गाठी सैल होणार असून कदाचित व्याप्त काश्मीरमध्ये निर्णायक कारवाई करणे भारतालाच सोयीचे होईल, तेव्हा पाकिस्तानला मात्र, अशा संकटग्रस्त स्थितीत आपल्यासोबत कोण आहे का हे मागे वळून शोधूनच पाहावे लागेल. शिमला करारात भारत आणि पाकिस्तानातील कोणत्याही वादावर द्विपक्षीय चर्चेतून तोडगा काढण्यावर भर दिला गेला होता. मात्र त्याचेही वारंवार उल्लंघन करून भारताचा अविभाज्य भाग असलेल्या काश्मीरचा वाद आंतरराष्ट्रीय मंचावर नेण्याचा सातत्याने प्रयत्न केल्याने या कराराचा भंग याआधीही पाकिस्तानकडून झाला आहे. सिंधू करारास स्थगिती देण्याच्या भारताच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्यांना आता शिमला करार रद्द करण्याच्या पाकिस्तानच्या धमकीनंतर कोणत्या शंका येतील याचा अंदाजच बांधणे अवघड नाही. कारण, निर्णायक कृतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरिता पाकिस्तान सहकार्य करत असल्याने भारतासंदर्भात मुक्तपणे शंका व्यक्त करणाऱ्यांना अशा वेळी मात्र, मूग गिळणेच सोयीचे ठरेल.

## आंतरराष्ट्रीय

# मूर्तिभंजक अफगाण आता मूर्तिसंरक्षक

**प्रा. जयसिंग यादव**

२०२१ मध्ये सत्ता हाती घेण्यापूर्वी तालिबान सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्याबाबत बोलली होती; परंतु या दाव्याबाबत अनेकांच्या मनात शंका होती. दोन महिन्यांपूर्वी तालिबान प्रशासनाने घोषणा केली की, अफगाणिस्तानमधील वारसा आणि ऐतिहासिक ठिकाणांचे संरक्षण, देखरेख आणि जतन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. 'तो' आपल्या देशाच्या समृद्ध संस्कृतीचा, इतिहासाचा आणि ओळखीचा भाग आहे. अनेक दशके चाललेल्या युद्धाच्या समाप्तीनंतर, बौद्ध धर्माशी संबंधित अनेक अवशेष आता खुद्द तालिबान प्रशासनाकडून उघड केले जात आहेत. उत्खननादरम्यान ते सापडल्याचा दावा केला जात आहे. याशिवाय, पूर्व अफगाणिस्तानमधील लघमान प्रांतातील गौवर्जन गावात खडकांमध्ये तयार केलेले पोकळ भाग २००० वर्ष जुन्या कुशाण साम्राज्याशी जोडले जात आहेत. हे खडकाळ खड्डे कुशाण साम्राज्याचे भांडार असल्याचे बोलले जात आहे. हे साम्राज्य एके काळी गोबीच्या वाळवंटापासून गंगा नदीपर्यंत पसरले होते. लघमानमध्ये दगडांवर ब्राह्मी लिपीमध्ये लिहिलेले शिलालेख आणि एक दगडी पाटीही सापडली असून त्यात द्राक्षे दळून वाईन बनवल्यासारखे दिसते. लघमानच्या संस्कृती आणि पर्यटन विभागाचे प्रमुख मोहम्मद याकूब अयुबी यांनी सांगितले, की अफगाणिस्तानला पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. हे अवशेष त्याचा पुरावा आहेत. येथे राहणारे लोक, मग ते मुस्लिम असोत वा नसोत; त्यांचे येथे साम्राज्य होते. तालिबान या ठिकाणांच्या सुरक्षेला महत्त्व देते. या मताला गझनी प्रांतातही पाठिंबा मिळाला. तेथील संस्कृती विभागाचे प्रमुख हमीदुल्ला निसार यांनी सांगितले की, बामियानच्या बौद्ध शिल्पांचे जतन केले पाहिजे आणि भविष्यातील पिढ्यांना वारसा म्हणून सुपूर्द केले पाहिजे कारण ते आपल्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहेत.

हा एक महत्त्वाचा विषय आहे. मात्र, हा सांस्कृतिक वारसा १९९६ ते २००१ दरम्यानच्या पहिल्या तालिबान राजवटीत सापडला असता तर वेगळे परिणाम पाहायला मिळाले असते. २००१ मध्ये तालिबानचा संस्थापक मुला उमरने मूर्तिपूजा थांबवण्यासाठी सर्व बौद्ध मूर्ती नष्ट करण्याचा आदेश दिला आणि काही दिवसांमध्येच आंतरराष्ट्रीय निषेध असूनही बामियान येथील १५०० वर्षे जुन्या बुद्ध मूर्तींवर क्षेपणास्त्रे डागण्यात आली. लघमानचे हेरिटेज संवर्धन संचालक मोहम्मद नादिर मखवार यांनीही मागील सरकारमध्ये हेच पद भूषवले होते. ते म्हणाले की, तालिबान परतले तेव्हा लोकांना वाटत होते की ते पूर्वीसारखे ऐतिहासिक वारशांना महत्त्व देणार नाहीत; पण प्रत्यक्षात ते याला खूप महत्त्व देत आहेत. डिसेंबर २०२१ मध्ये तालिबानने अफगाण राष्ट्रीय संग्रहालय पुन्हा उघडले. त्यांनी स्वतः गैर-इस्लामिक वस्तूंचे नुकसान केले होते. २०२२ मध्ये, त्यांनी ऐतिहासिक बौद्ध स्थळ मेस आयनाक जतन करण्यासाठी 'आगा खान ट्रस्ट फॉर कल्चर' (एकेटीसी) कडे मदत मागितली.

आता बामियानमध्ये बुद्ध मूर्तीविषयी वारसास्थळांचे महत्त्व सांगणारे फलक दिसू लागले आहेत. 'इंटरनॅशनल असोसिएशन फॉर द कॉन्झर्व्हेशन ऑफ ह्यूमन हेरिटेज'च्या संचालक वॅलेरी फ्रॅलँड यांच्या मते बामियान बुद्धमूर्तींचा नाश आपल्या प्रतिमेला किती हानिकारक होता, हे आता तालिबानला समजले आहे. त्यांचा असा विश्वास आहे की आता तालिबानला प्रत्येक प्रकारचा भौतिक वारसा जपायचा आहे. तथापि, तालिबानचे स्वारस्य केवळ पुतळे आणि इमारतींपुरती मर्यादित असल्याचे काही तज्ज्ञांनी उघड केले. प्रत्यक्षात इस्लामच्या नावाखाली आजही संगीत, नृत्य, लोककथा आणि महिलांशी संबंधित समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. उदाहरणार्थ, हेरात शहरातील ज्यूंचे जुने प्रार्थनास्थळ जतन केले गेले आहे; परंतु शहरातील प्राचीन ज्यू समुदायाच्या सद्य:स्थितीबद्दल कोणतीही बातमी नाही. तालिबानने आपल्या पहिल्या कारकीर्दीपासून अनेक आंतरराष्ट्रीय वारसा करारांवर स्वाक्षरी केली आहे. देशाच्या वारशाची हानी करणे हा त्या करारानुसार २०१६ पर्यंत 'युद्ध गुन्हा' बनला होता. आता या वारसा संवर्धनामुळे त्यांना पर्यटन आणि आर्थिक विकास दोन्ही साध्य करण्याची महत्त्वाची संधी उपलब्ध होऊ शकते; मात्र हे साध्य करण्याआधी तालिबानसमोर दोन मोठ्या अडचणी आहेत. एक म्हणजे पैशाची कमतरता आणि दुसरे म्हणजे पुरातत्त्व आणि वारसा यांचे ज्ञान असलेले लोक आता देश सोडून गेले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न मोठा आहे. कारण गेल्या वर्षी बामियानला भेट देणाऱ्या एका गटावर दहशतवादी हल्ला झाला होता. एकीकडे ही स्थिती असताना दुसरीकडे अफगाण तालिबानबाबत रशियाने आपल्या भूमिकेत मोठा बदल केला आहे. गुरुवारी रशियाच्या सर्वोच्च न्यायालयाने तालिबानचा दहशतवादी संघटनेचा दर्जा काढून टाकला. या निर्णयामुळे २००३ मध्ये लादण्यात आलेली बंदी संपुष्टात आली. या निर्णयाकडे मुत्सद्दी दृष्टिकोनातून तालिबानचा मोठा विजय म्हणून पाहिले जात आहे. रशियन सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय देशाच्या अभियोजन कार्यालयाने केलेल्या अपीलनंतर आला आहे. गेल्या वर्षी रशियामध्ये एक नवीन कायदा संमत करण्यात आला होता. न्यायालयांना एखाद्या संघटनेला दहशतवादी संघटना घोषित करण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा तो अधिकार होता. या तरतुदीनुसार तालिबानवरील बंदी उठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती, जी आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने पूर्ण झाली आहे. अफगाणिस्तानमध्ये अमेरिका आणि नाटो सैन्य सक्रिय असताना २००३ मध्ये रशियाने तालिबानला अधिकृतपणे दहशतवादी संघटना घोषित केले होते; पण २०२१ मध्ये अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्याने माघार घेतल्यानंतर आणि तालिबान काबूलमध्ये परतल्यानंतर रशिया आणि तालिबान यांच्यातील संबंध वाटाघाटीच्या पातळीवर आले. अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक रशियन अधिकाऱ्यांनी तालिबानच्या प्रतिनिधींशी भेट घेतली आहे. आता या नव्या कायदेशीर दर्जामुळे दोन्ही देशामधील संबंध औपचारिक करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. रशिया मध्य आशिया आणि अफगाण क्षेत्रात आपली राजनैतिक पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. तालिबान राजवटीला अद्याप आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली नाही; परंतु रशियासारख्या देशांनी उचललेली पावले त्यांच्यासाठी या दिशेने मार्ग खुला करू शकतात. काही दिवसांपूर्वी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईत घेतलेली अफगाणिस्तानचे प्रभारी परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांची भेट पाकिस्तानविरोधातील मोठी खेळी मानली जात आहे. तथापि, भारताने या संघटनेला देशाचे सरकार म्हणून मान्यता दिलेली नाही. अशी मान्यता न मिळण्यामागे त्याचा रानटी इतिहासही कारणीभूत आहे. नव्वदच्या दशकात या संघटनेने काबूल ताब्यात घेतले. येथून देशावर अतिरेकी शक्तींचे राज्य सुरू झाले. तिने महिलांना बुरखा घालण्यास आणि पुरुषांची सोबत असल्याशिवाय घराबाहेर पडू नये असे सांगितले. सध्या भारताने तालिबानला सरकार म्हणून पूर्ण मान्यता दिलेली नाही; पण तालिबानने अतिरेकी मार्गापासून दूर राहण्याची हमी दिल्याने तो या मार्गावर निघाला आहे. यापूर्वी अफगाणिस्तान पूर्णपणे पाकिस्तानच्या प्रभावाखाली होता. आता मात्र चित्र वेगळे आहे. या दोन देशांमधील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. अशा परिस्थितीत तालिबानने बदलत असल्याचा संकेत देऊन भारताशी संबंध जोडले आहेत. ते दोन्ही देशांच्या हिताचे आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# अखेर मोदींनी सोडले जलास्त्र

पाकिस्तानने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. धर्मद्वेषाने पछाडलेल्या या विकृत देशाची नांगी ठेचण्याची वेळ येऊन ठेपली आहे. गेली अनेक दशके भारताने पाकिस्तानच्या विकृत आणि राक्षसी कृत्याचा सामना केला आहे. हिंदूंच्या रक्तासाठी आसुसलेल्या पाकिस्तानविरोधात संपूर्ण देशामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, त्याचा कायमचा सोक्षमोक्ष लावण्याची मागणी देशात होत आहे. पहलगाम हल्ल्यामध्ये २८ निरपराध हिंदूंची हत्या हे अमानवीय कृत्य असून, संपूर्ण जगाने या हत्याकांडाचा निषेध करून भारताला पाठिंबा दिला आहे. या घटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी कमालीचे अस्वस्थ झाले असून, पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्यासाठी त्यांनी रणनीती आखली आहे. पाकिस्तानला वठणीवर आणण्यासाठी त्यांनी सिंधू जल वाटप करार रद्द करून जणू काही पाकिस्तानवर अणुबॉम्ब टाकला आहे. हा निर्णय वरवर जरी सहज आणि साधा वाटत असला, तरी त्याचे दूरगामी परिणाम पाकिस्तानसाठी भयंकर असे होणार आहेत.

दोन्ही देशांमधील संबंधामध्ये प्रदीर्घ काळापासून कटुता असली, तरी गेल्या ६० वर्षांपासून या करारास भारताने हात लावला नव्हता. भारत आणि पाकिस्तानने १९६५, १९७१ व १९९९ अशी तीन युद्धे लढली आहेत तसेच तीन दशकांहून अधिक काळ भारत दहशतवादाचा बळी ठरला आहे. तरीही भारताचा संयम ढळला नाही. मात्र, निरपराध हिंदूंच्या हत्याकांडानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्याचा प्रण केला आहे.



पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाने हजारो निरपराध भारतीयांचे बळी घेतले. लाखो काश्मिरी पंडितांना आपले घरदार सोडून आपल्याच देशामध्ये निर्वासित व्हावे लागले. तरीही भारताची मर्जी पाकिस्तानवर कायम होती. सर्वप्रथम २०१९ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुलवामा हल्ल्यानंतर सिंधू नदीचे पाणी रोखण्याचा इशारा दिला होता. तो आता प्रत्यक्षात येणार आहे. सिंधू जल करारानुसार सिंधू नदीच्या खोऱ्यातील रावी, बियास आणि सतलज या पूर्वेकडील तीन नद्यांचे पाणी भारताच्या वाट्याला येते तर सिंधू नदीच्या खोऱ्यातील सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील तीन नद्यांचे ८० टक्के पाणी पाकिस्तानला दिले जाते. जागतिक बँकेच्या पुढाकाराने १९६० मध्ये पाणी वितरणाचा करार अस्तित्वात आला. परंतु, आता तो भारताने स्थगित केला असून, त्यामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडणार हे निश्चित आहे. २०१६ च्या पाक पुरस्कृत पुलवामा हल्ल्यानंतर भारताने एअर स्ट्राईक करून पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले होते. तरीही पाकिस्तान वठणीवर येत नाही, हे बघून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टोकाचे पाऊल उचलले आहे. सिंधू जल करार स्थगित करणे ही तर प्राथमिक सुरुवात आहे. या एकाच निर्णयाने पाकिस्तानची हवा टाईट झाली आहे. तेथील राजकारण्यांचे मानसिक संतुलन ढासळले आहे. हे त्यांच्या बेताल वक्तव्यावरून सहज लक्षात यावे. नरेंद्र मोदी यांनी घेतलेला हा निर्णय एवढा भयंकर आहे. लोकांना मात्र याची जाणीव नाही. सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकपेक्षाही हा निर्णय भविष्यामध्ये प्रभावी ठरणार आहे. अणुबॉम्बपेक्षाही अचूक असे जलास्त्र नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानवर सोडले आहे. परंतु, त्याच्या परिणामासाठी आणि खात्रीसाठी देशवासीयांना काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. पाकिस्तानची ८० टक्के शेती भारताच्या या पाण्यावर अवलंबून आहे. पाकचे उद्योग भारताच्या पाण्यावर आश्रित आहेत. पाकिस्तानच्या आर्थिक विकासाचा कणाच भारतीय पाणी आहे. यास भारताने कधीच हात लावण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु, हा करार स्थगित होताच पाकिस्तान पूर्णपणे बिथरला आहे. मोदी यांच्या या एका निर्णयाने पाकिस्तानच्या पायाखालची जमीन सरकली आहे. पाक पुरस्कृत दहशतवादामुळे नाहक भारतीयाचा बळी जात आहे, हे तेथील जनतेला कळायला हवे. उद्योगपतींना कळायला हवे. तेथील शेतकऱ्यांना कळायला हवे. नंतर ते आपल्या सरकारला याचा जाब विचारतील. पहलगाम हत्याकांडावरून पाकिस्तानने स्वतःच आत्महत्या केली आहे. त्यानंतर भारताने जलास्त्र चालवून पाकिस्तानला बेचिराख करण्याची योजना आखली आहे. भारतीय जनतेने काही काळ धीर धरून त्याचा परिणाम बघण्यासाठी वाट बघावी. जनतेच्या मनामध्ये जे जे आहे, ते सर्व काही नरेंद्र मोदी करतील एवढा हा आश्वासक चेहरा नक्कीच आहे.

९८८१७१७८५६

२२ एप्रिल २०२५ ही तारीख आपल्या देशाच्या इतिहासात एकापेक्षा जास्त कारणासाठी किंवा घटनेसाठी आवर्जून नोंदवावी लागेल. त्यातली एक अत्यंत महत्त्वाची आणि साहजिक घटना म्हणजे आपल्या देशातील काश्मीर मधल्या पहलगाममधे झालेला दहशतवादी हल्ला आणि त्या हल्ल्यात बळी पडलेले २५ हून जास्त निरपराध हिंदू नागरिक.

# लक्षाधीश सोने



ही घटनाच इतकी धक्कादायक , भीतीदायक होती आणि आहे की त्यामुळे त्यादिवशी घडलेली दुसरी महत्त्वाची घटना पूर्णपणे झाकोळली गेली आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी घडलेली पण ही झाकोळली गेलेली दुसरी घटना म्हणजे त्यादिवशी आपल्या देशाच्या बाजारात सोन्याचे भाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे पोचले. वरवर पाहता, निदान सकृतदर्शनी, तरी या दोन घटकांचा किंवा घटनांचा तसा थेट संबंध नाही. त्यामुळे या किंवा अशा घटना या एकमेकांचे कारण आणि परिणाम आहेत असे विधान पटकन पटणारे नाही. त्या अर्थाने पहलगाम मधे झालेला हिंदू नागरिकांवर दहशतवादी हल्ला आणि सोन्याचे भाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे पोचणे या एकाच दिवशी घडलेल्या दोन घटकांचाही तशा अर्थाने थेट संबंध नाही. एकमेकांचे कारण आणि परिणाम (Cause - Effect Relationship अशा अर्थाने) असे नातेबंध नाही. पण जरा शांतपणे आणि दीर्घकालीन विचार करायचा झाला तर याच दोन घटना असे नव्हें तर अशा स्वरूपाच्या दोन घटनांमध्ये संबंध असतो.

आणि तो संबंध पूर्णपणे बादरायण किंवा ओढून ताणून आणलेला नसतो. युद्ध, युद्धजन्य कुरबुरी, दहशतवादी हल्ला, कोरोना सारखी जागतिक प्रभाव करणारी ( तथाकथित ) वैद्यकीय आणीबाणी अशा घटकांचा आणि घटनांचा निःसंदिग्ध असा परिणाम स्थानिक आणि जागतिक बाजारात सोन्याच्या किरकोळ व घाऊक बाजारात नक्कीच होतो. असा विचार करायला लागले की लक्षात येते की २२ एप्रिल २०२५ रोजी आपल्या देशात सोन्याचे बाजारभाव १,००,००० च्या पार होण्यात पहलगाम हल्ला हे कारण नसेल आणि नाही; पण दहशतवादी हल्ला, युद्ध, रोगराई, राजकिय स्पर्धा यातून निर्माण होणारी परिस्थिती हे सोन्याचे भाववाढीचे कारण असते असाच गेल्या काही दशकांचा इतिहास आहे.

त्यामागची तर्कसंगत कारणमीमांसा आवर्जुन लक्षात घेण्याजोगी आहे. दहशतवादी हल्ला, युद्ध, युद्धजन्य परिस्थिती, कट-कारस्थान-कारवाई, प्रदीर्घ काळ चालणारी रोगराई असे घटक आणि घटना एकप्रकारची अस्थिरता, अनिश्चितता निर्माण करतात. आणि ही अशी अस्थिरता - अनिश्चितता सोन्याचे बाजारभाव चढे करतात आणि ठेवतात. अशा पार्श्वभूमीवर २२ एप्रिल २०२५ रोजी आपल्या देशात सोन्याचे बाजारभाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे नेण्यास त्याच दिवशी झालेला पहलगाम मधला हिंदु नागरिकांवरचा दहशतवादी हल्ला हे कारण नाही. आणि चुकूनमाकून असले तरी एकमेव कारण तर निश्चितच नाही. २२ एप्रिल २०२५ रोजी आपल्या देशात सोन्याचे बाजारभाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे जाण्याचे एक संभाव्य कारण आदल्याच दिवशी घडले होते. हे कारण प्रत्यक्षात घडले आहे आपल्या देशापासून भौगोलिक दृष्टया फार लांब. पण या घटनेचे संभाव्य परिणाम मात्र जेंव्हा केंव्हा होतील तेंव्हां मात्र ते आपल्या देशाच्या जवळपास होतील हे निर्विवाद ! आणि शेअरबाजारा प्रमाणेच Markets always discount the future हे वस्तू- बाजार, सेवा-बाजार, धातू-बाजार, तंत्र-बाजार यांच्याबाबतही खरे आहे आणि असते. त्यानुसार त्यादिवशी आपल्या देशातील बाजारात सोन्याचे भाव १,००,००० च्या पलीकडे जाण्यातले एक अगदी तात्कालीक कारण म्हणजे त्या दिवसांत अमेरिकी राष्ट्राध्यक्ष आणि युक्रेनचे राष्ट्रप्रमुख यांच्यात झालेली भेट. मधे काही दिवस ( गेले कित्येक महिने धुमसत असलेले ) रशिया - युक्रेन युद्धात पुन्हा एकदा अचानक रशियाने युक्रेनवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याची या अमेरीका - युक्रेन राष्ट्र प्रमुखांच्या भेटीला पार्श्वभूमी होती. या भेटीनंतर रशियाला युक्रेन युद्ध लवकर संपवण्यासाठी स्वारस्य नसावे असे वाटते अशी व्यक्त केली गेलेली प्रतिक्रिया फार बोलकी आहे. त्यातही अलिकडच्या काळात जागतिक व्यापारात एकाधिकारशाही मिळवण्यासाठी अमेरीका - रशिया - चीन यांच्यात व्यापारी युद्ध सुरू झाले आहे का अशी चर्चा सध्या सुरू आहे. अगदीं व्यापारी युद्ध सुरू झाले नसले तरी या तीन राष्ट्रातील स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत चालल्याची कुजबुज नक्कीच आहे. अशा गोष्टींचा सोन्याच्या बाजारभावाशी एका वेगळ्या तऱ्हेने संबंध असतो. आणि झटकून टाकावा इतका तो लांब - लांबचाही नसतो. कोणत्याही कारणाने अनिश्चितता - अस्थिरता जाणवायला लागली किंवा त्याची चाहूल लागली की जागतिक गुंतवणूक क्षेत्रातील तरलता ( Liquidity qH$dm Investible Surplus ) आपला रोख सोन्याच्या खरेदी कडे वळवते. आणि त्यातून सोन्याचे भाव चढे राहतात. आपण असे सारे २०२० साली कोरोनाचा जगभरात प्रादुर्भाव झाला तेंव्हां अनुभवले आहे. अर्थात हा प्रादुर्भाव , त्याचा प्रभाव, त्याचा प्रसार, त्याचा प्रचार जसजसा कमी होत गेला , तसतसे सोन्याचे बाजारभाव टप्प्याटप्प्याने खाली येण्याचाही अनुभव त्यावेळी आपण घेतला आहे. अशी अस्थिरता आर्थिक असू शकते. अशी अस्थिरता राजकीय असू शकते. अशी अस्थिरता सामाजिक असू शकते. अशी अस्थिरता स्थानिक असू शकते. अशी अस्थिरता राष्ट्रीय असू शकते. अशी अस्थिरता जागतिक असू शकते. अशी अस्थिरता तात्कालीक असू शकते. अशी अस्थिरता मध्यमकालीन असू शकते. अशी अस्थिरता दिर्घकालीन असू शकते. आणि कोणत्याही प्रकारच्या अस्थिरतेचे मोठ्या दीर्घकालीन गुंतवणुकीला वावडे असते. या वाक्यातील दीर्घकालीन आणि मोठ्या हे दोन्ही शब्द महत्त्वाचे आहेत. अशी अस्थिरता जेंव्हा नसते तेंव्हां हा पैसा शेअरबाजार, वस्तूबाजार, सेवाबाजार, तंत्रज्ञान, प्रवर्तकीय सहभाग असा विविध प्रकारे गुंतवला जातो. जसजशी अस्थिरतेची तीव्रता सुरू होते-वाढत जाते, तसतसे गुंतवणुकीचे इतर मार्ग किंवा साधने यात गुंतवलेल्या किंवा गुंतवले जाऊ शकतील अशा पैशांचे प्रमाण कमी कमी होत जाऊन तो ओघ सोन्याच्या किंवा सोन्यातील गुंतवणूकीकडे वळू लागतो असा आजपर्यंतचा अनुभव आहे. अशा अस्थिरतेच्या काळात सोन्याचे भाव चढे राहण्यात अजून एक पैलू असतो आणि तो पैलू म्हणजे अशा काळात सरकारने किंवा सरकारी पुढाकाराने केली जाणारी सोन्याची खरेदी. अशा अस्थिर-अशांत काळात राष्ट्रीय अर्थव्यवस्था व त्यात असणारा तरल त्वरीत निधी सोन्याकडे वळवण्याचा सरकारी कल असतो. गंमत म्हणजे, आजमितीला जगात कोणत्याही देशाचे स्वयंभू , राष्ट्रीय चलन सुवर्णाधिष्ठीत ( Gold Based Currency ) नसूनही असे होते. अशा परिस्थितीत अशी सरकारी गुंतवणूक अनेकदा Parking of Funds स्वरूपाची असते ; Investing of Funds नव्हे. त्यातही सरकारी गुंतवणूक जेंव्हा सोन्याकडे वळते तेंव्हां त्यांची खरेदी एकरकमी असते ; पण त्यांची विक्री जेंव्हा केंव्हा होते तेंव्हां मात्र ती टप्प्या - टप्प्याने होते. यावेळी सोन्याचे भाव १,००,००० रुपयांच्या पलीकडे जाण्यामागे अजून एक संभाव्य कारण आहे. हे कारण म्हणजे २० एप्रिल २०२५ रोजी चीनने केलेली घोषणा. त्यादिवशी चीनने असे जाहीर केले की अमेरिका प्रणित व अमेरिका प्रभावित SWIFT पद्धतीच्या बाहेरील व्यवहारात येण्यास चीन सक्रियपणे इतरांना उद्युक्त करते आहे. त्यातून डॉलर मधील व्यवहार कमी होत इतर चलनाचे मूल्यांकन कसे, कधी, किती प्रभावित होईल याचा सध्या अंदाज घेणे सुरू आहे. अशा काळात, तात्पुरती का होईना पण सोन्याची सरकारी खरेदी वाढते. हे सारे यावेळीही सोन्याच्या बाजारभावात घडणार का ?

- चन्द्रशेखर टिळक

## वाचक पत्रे

### पंतप्रधानांच्या प्रत्येक कृतीस पाठिंबा आवश्यक

पहलगाम येथे झालेल्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्याचा प्रतिशोध घेण्यासाठी संपूर्ण देशवासीयांचे रक्त सध्या सळसळत आहे. यापुढे सिंधू नदीच्या पाण्याचा एक थेंब सुद्धा पाकड्यांना दिला जाणार नाही असे भारताने ठणकावले असून, सिंधू जल करार स्थगित केला आहे. हा तर ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी हैं. सध्या देशपातळीवर मोठ्या प्रमाणात उच्चस्तरीय बैठकांची मालिका सुरू असून पाकला कायमचा धडा शिकवण्यासाठीची तयारी चालली आहे. वेळ आणी तारीख हा गोपनीयतेचा विषय असल्याने केव्हा एकदा पाकड्यांवर हल्ला होतो आणि आम्ही भारतमातेच्या विजयाचा जल्लोष करू याच भावना आज संपूर्ण देशवासीयांच्या आहेत. जगभरातून भारताला मिळणारे समर्थन पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सफल विदेश नीतीचे द्योतक आहे. या संकट काळात सर्वपक्षीय समर्थन मोलाचे ठरते आणि ती या देशाची परंपरा आहे. सर्वपक्षीयांनी ती जोपासली याचा खरंच अभिमान आहे. सैनिकांच्या सुट्या रद्द झाल्या आहेत, रजेवर गेलेल्यांना भारत मातेने परत बोलावले आहे. या देशाचा जबाबदार नागरिक म्हणून त्या सैनिकांचे मनोबल वाढवताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रत्येक कृतीस समर्थन देताना देशभक्तिपर गीताच्या त्या ओळी नकळत ओठावर येतात, 'देश हैं पुकारता, पुकारती माँ भारती'...

**अखिल देशपांडे**/ अकोला

### निसर्ग बदलतोय की माणूस?

आजच्या वर्तमानकाळात हवामान बदलच्या घटना वाढत आहेत. तापमानवाढ, पूर, दुष्काळ, चक्रीवादळे यासारख्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. आपण सहजपणे म्हणतो निसर्ग बदलतोय पण थोडा विचार केला तर लक्षात येते, खरा बदल निसर्गात नव्हे, तर माणसाच्या वागण्यात झाला आहे. पूर्वी माणूस निसर्गाच्या नियमांनुसार जगायचा. तो झाडे लावायचा, पाणी जपायचा, जमिनीचा सन्मान करायचा. पण जसजशी प्रगती झाली, तसतसे माणूस निसर्गावर वर्चस्व मिळवू लागला. विकासाच्या हव्यासाने घनदाट जंगलतोड झाली, नद्या प्रदूषित झाल्या, सिमेंटीच्या कारखान्यांतून धूर आणि सांडपाणी सोडले गेले. रासायनिक औषधांचा वापर त्यामुळे हवामान चक्र बिघडले त्यामुळे ऋतू अनियमित झाले. निसर्गाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य होते, ते आपण विसरलो. त्यामुळे आता निसर्गही आपली बदलती प्रतिक्रिया दाखवत आहे. निसर्ग आपला स्वभाव विसरत नाही, बदल माणसाच्या विकासावर आहे. आपणच जर वागणूक बदलली नाही, तर निसर्गाचे रौद्ररूप आपल्याला रोखता येणार नाही. म्हणूनच वेळेत जागे होऊन निसर्गाशी पुन्हा नाते जोडणे, त्याचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे.

**मुनीश्वर मलेवार**/ ९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नागरिकांना विहीत कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देणार– जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

जिल्ह्यातील नागरिकांना विनाविलंब आणि विनासायास, तसेच ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्याला राज्य शासनाचे प्राधान्य आहे. त्यासाठी अनेक सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून, या सेवा शहरापासून ते गावाखेड्यापर्यंतच्या नागरिकांना विनाविलंब उपलब्ध करून देणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी येथे सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात सेवा हक्क दिनाच्या दर्शकपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री. गुप्ता बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, तहसीलदार अश्विन माने उपस्थित होते.

शासनाने दिनांक १ एप्रिल २०१५ रोजी '२८ एप्रिल' हा दिवस महाराष्ट्र राज्याच्या जनतेसाठी तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने आज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, १० वर्षांपूर्वी शासनाने जनतेला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क देणारा 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५' अंमलात आणला आहे. या अधिनियमातील कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अशा नियत कालमर्यादेतच जनतेला लोकसेवा देण्याची जबाबदारी दिली आहे आणि त्यासाठी आवश्यक असणारे त्याचे उत्तरदायित्व निश्चित केले असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले. हा लोक सेवा हक्क अधिनियम प्रशासकीय अधिकाऱ्यांना कर्तव्य भावनेतून जनतेची सेवा करण्यासाठी प्रेरीत करत असल्याचे सांगून ते म्हणाले की, शासनाने आयोगाच्या शिफारशी नुसार आयोगाने निर्धारीत नागरीकांना दिल्या जाणाऱ्या सर्व अधिसूचित सेवा कालमर्यादेत देण्याचे सांगितले आहे. अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा सेवाभाव हेच कर्तव्य ही कर्मयोगाची भावना असल्याचे सांगितले.

राज्य शासनाने महाराष्ट्र लोक सेवा हक्क आयोगाची दशकपूर्ती साजरी करण्याचे निर्देश देण्यात आले असून, हा एक चांगला उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिसूचित केल्या आहेत. या सेवा शहरापासून ते गावखेड्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यात अजूनही सुधारणा करण्यास वाव आहे, असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

या सेवा नागरिकांना घरबसल्या मिळाव्यात, यासाठी काम करूयात. या सेवा केंद्र संचालकाकडून मिळवून दिल्या जात आहेत. त्यामध्ये अजून उत्तम नियोजन करून कर्मचाऱ्यांमार्फत अधिक सेवा घरपोच देण्याचा प्रयत्न करूयात, असे सांगितले. ऑनलाईन सेवा विहित मुदतीत देण्याचा राज्य शासनाचा आणि जिल्हा प्रशासनाचा मनोदयही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी व्यक्त केला. नागरिकांना वेळेत आणि पारदर्शकतेने, विनासायास आणि सहज घरच्या घरी ऑनलाईनरित्या या अधिसूचित सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड यांनी प्रास्ताविकात या दिनामागची भूमिका, त्याची प्रभावी अंमलबजावणीबाबत माहिती दिली. उत्कृष्ट काम करणा–या उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, शारदा दळवी, पोलीस अधिकारी कुंदन कुमार वाघमारे, सरकारी कामगार अधिकारी टी. ई. कराड या अधिका–यांचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपले सरकार सेवा केंद्रांचे संचालकांना जिल्हाधिका–यांच्या हस्ते लैपटॉपच्या किटचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना लोकसेवेची शपथ देण्यात आली. तहसीलदार अश्विन माने यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# आजम कॉलनीतील चार दुकानांना आग, जीवीत हानी नाही

## महसुल विभागाकडून नुकसानीचे पंचनामे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

शहरातील आजम कॉलनी भागातील चार दुकानांना दुपारी एकच्या सुमारास अचानक आग लागल्याने या दुकानातील साहीत्य जळून खाक झाले. यावेळी स्थानिक नागरिक आणि अग्नीशमन दलाच्या पथकाने आग विझवण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. परंतु आगीने रौद्ररूप धारण केल्याने दुकानातील सुमारे सहा ते सात लाखांचे नुकसान झाले असून महसुल विभागाने तातडीने पंचनामे केले आहेत.

शहरातील आजम कॉलनी भागातील चार दुकानांना दि २९ एप्रिल रोजी अचानक आग लागली. या आगीने काहीवेळातच रौद्ररूप धारण केल्यामुळे या चार दुकानातील साहीत्य जळून खाक झाले आहे. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवीत हानी झाली नाही. सोहेलखान वहीदुल्लाखान पठाण यांचे किराणा दुकानातील साहीत्य व सामान जळाले अंदाजे १ लाख १० हजारांचे नुकसान झाले आहे. शेख कलीम शेख हबीब यांच्या दुध डेअरीतील साहीत्य जळून ९३ हजारांचे नुकसान झाले आहे. अमीर खान मकसुद खान यांचे कुलरचे दुकानातील सर्व साहीत्य जळून १ लाखांचे नुकसान झाले आहे तर शेख फारूख शेख हबीब यांच्या कुलरच्या दुकानाला आग लागल्याने २ लाख २८ हजारांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात आले आहे.

दुपारी एक वाजता अचानक आग लागल्याने सर्व९ खळबळ उडाली स्थानीक नागरिकांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला तसेच अग्नीशमन दलही पाचारण करण्यात आले परंतु आगीत दुकानातील सर्व साहीत्य जळून खाक झाले मात्र आग विझवण्यात अग्नीशमन दलाला यश आल्यामुळे आग आटोक्यात आली. या घटनेची माहीती मिळताच महसुल विभागाच्या पथकाने नुकसानीचे पंचनामे केले आहेत.

# कॉन्व्हेंट शाळांना लाजविणारी सेनगाव तालुक्यातील गुगुळपिंपरी येथील जिल्हा परिषद शाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**



आपल्या पाल्याला इंग्रजी आलं म्हणजे तो जगात कुठेही स्पर्धा करू शकतो. या भाबड्या गैरसमजुतीतून काही पालक 'कॉन्व्हेंट स्टाईल' शाळेकडे वळत आहेत. मात्र, गुणवत्तापूर्ण शिक्षण हे केवळ आणि केवळ जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच मिळत असल्याचे अनेक शाळांनी सिद्ध केले आहे. सेनगाव तालुक्यातील गुगुळपिंपरी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये इंग्रजीच काय तर मुलांमध्ये प्रचंड गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन एक नवा आदर्श घडविण्याचे कार्य येथील शिक्षकांनी केले आहे.

सेनगाव तालुक्यातीला गुगळपिंपरी या गावात इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत वर्ग आहेत. प्रत्येक वर्गाला एक याप्रमाणे ८ शिक्षक या शाळेत ज्ञानदानाचे कार्य करतात. या शाळेचे उच्चश्रेणी मुख्याध्यापक पोहकर हे आहेत. तर सहाय्यक शिक्षकांमध्ये भाऊराव शिंदे, किशोर हनवते, भागवत डांगे, सचिन तायडे, दत्ता लहाने, अडबलवार, रणबावळे, आणि बोरकर हे शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करतात. या शाळेला प्रशस्त असा मोठा परिसर असून जुनीच परंतु देखणी इमारत आहे. प्रशस्त असे मैदान असून या परिसरात विविध फुल झाडांची लागवड केलेली असल्यामुळे शाळेच्या सौंदर्यात आणखी भर पडते. शाळेचे सौंदर्य जसे मनमोहक आहे, तसेच येथील गुणवत्ताही वाखाण्याजोगी आहे. विद्यार्थ्यांना घडविण्यामध्ये येथील शिक्षकांनी प्रचंड मेहनत घेतली आहे. ही संपूर्ण शाळा डिजिटल असून प्रत्येक वर्ग खोलीमध्ये स्मार्ट टीव्ही, लॅपटॉप आणि प्रोजेक्टर आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शिक्षण घेण्यास कुठलीही अडचण येत नाही.

कॉन्व्हेंट स्टाईल शाळांच्या कितीतरी पटीने समृद्ध अशी ही शाळा आहे. येथील काही पालकांनी आपल्या मुलांना कॉन्व्हेंट शाळेमध्ये दाखल केले होते. ही बाब येथील शिक्षकांना माहीत झाल्यानंतर त्यांनी त्या पालकांची एक बैठक घेऊन कॉन्व्हेंट शाळेच्या कित्येक पटीने आम्ही चांगले शिक्षण देऊ आणि आपला मुलगा कुठेही मागे राहणार नाही याची आम्ही निश्चित काळजी घेऊ. पुढील एक वर्षात याचे आपणास 'रिझल्ट' मिळतील असे शिक्षकांनी ठामपणे सांगितले. त्यानंतर त्या पालकांनी आपल्या मुलांना या शाळेत दाखल केले. दरम्यान प्रचंड मेहनत घेऊन शिक्षकांनी मुलांना घडविले. इयत्ता पहिली ला शिकविणारे भाऊराव शिंदे या शिक्षकानी इयत्ता पहिलीतील मुलांना इंग्रजी विषयात पारंगत केले, परिणामी हे विद्यार्थी खाडखाड इंग्रजी वाचत आहेत. तसेच मराठी आणि इंग्रजी मध्ये एक लाख अंकाची ओळख या विद्यार्थ्यांना झाली आहे. यामुळे पालकही प्रचंड समाधानी आहेत. विद्यार्थ्यांच्या या गुणवत्तेचे गावकऱ्यांसह परिसरातील गावांमध्ये कौतुक होत आहे. शाळा ही समाज परिवर्तनाचे माध्यम असते हे येथील शिक्षकांनी सिद्ध केले आहे. गुगुळपिंपरीच्या या जिल्हा परिषद शाळेने हिंगोली जिल्ह्यात एक नवा आदर्श निर्माण केला असून याची जिल्हा प्रशासनाने योग्य प्रकारे दखल घेतली आहे. या शाळेमुळे गुगुळपिंप्री गावाला एक नवा आयाम मिळाला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यालयाचे लोकार्पण

हिंगोली– हिंगोली शहरातील रेल्वे स्टेशन समोर उभारण्यात आलेल्या सुदर्शन या भव्य वास्तूचे दि ३० एप्रिल रोजी बुधवारी अक्षय तृतीयाचे शुभ मुहूर्तवर लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या प्रसंगी परभणी विभागाचे विभाग संघ चालक डॉ.रामेश्वर नाईक हे उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११.३० मिनिटांनी लोकार्पण सोहळा असून दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत तीर्थ प्रसाद चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक मंडळातील स्वयंसेवक उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ७ वाजता प्रार्थनेने कार्यक्रम समारोप होणार आहे, असे हिंगोली जिल्हा प्रचार प्रमुख ॲड दिलीप झंवर यांनी कळविले आहे.

### विविध कार्यकारी सोसायटीची बिनविरोध निवड



हिंगोली– हिंगोली तालुक्यातील राहोली बुद्रुक येथील संचालक कृ. उ.बा.समिती हिंगोली व सरपंच रवी डोरले यांच्या मार्गदर्शनाखाली राहोली बु. येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी माधवराव तुकाराम डोरले यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून. तर उप चेअरमनपदी पुंजाबाई किसनराव जावळे यांची निवड करण्यात आली आहे. संचालकपदी सुभाष जावळे, दिनकर लोणकर, रानोजी जावळे, मुकिंदराव लोणकर, गंगाराम लोणकर, कैलासराव सोडगीर, निर्मलाबाई डोरले, इंदुबाई डोरले, सय्यद अब्दुल सय्यद गफूर, शामराव नानवटे, रवी डोरले यांची संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे. सहकार पणन वस्त्रोद्योग विभाग कार्यालय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व सावकारांचे निबंधक कार्यालय या ठिकाणी संबंधित पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी व्ही.ऐ. गीते, सचिव व्ही.के .ठोके, शेषराव ठाकरे आदी उपस्थीत होते. सर्व निवड झालेल्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपसरपंच रमेश जावळे, नामदेव जाधव, शेख इस्माईल, पांडुरंग डोरले, ज्ञानबा डोरले, संजय डोरले, सरपंच रवी डोरले आदींची उपस्थिती होती.

### रामलीला मैदानात आता नो एंट्री

हिंगोली– शहरातील रामलीला मैदानावर मागील काही महिन्यांपासून रात्रीच्यावेळी तळीराम मोठ्या संख्येने दारू पीत बसत असून त्याठिकाणी काचेच्या बाटल्या आणि इतर साहीत्य फेकून जात असल्यामुळे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी येणारे नागरिक तसेच सरावासाठी येणारे विद्यार्थी, खेळाडू यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर महसुल विभागाच्यावतीने या मैदानाला चारही बाजुनी असलेले गेट बंद करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे आता रामलीला मैदानात नो एंट्री असणार आहे.

# एबीएम इंग्लीश शाळेत मायक्रोसॉफ्टच्या मदतीने तांत्रिक शिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**

शहरातील एबीएम इंग्लिश हायस्कूल येथे जगातील मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या साह्याने विद्यार्थ्यांना अत्यंत आधुनिक असं तंत्रज्ञान शिक्षण देण्यात येत आहेत. संपूर्ण जिल्ह्यातून या तांत्रिक शिक्षणासाठी मायक्रोसॉफ्टच्या मदतीने एबीएम इंग्लिश हायस्कूलची निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट भवितव्याकडे आणि तांत्रिक प्रगतीकडे वाटचाल करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. मायक्रोसॉफ्ट स्कूल् या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेमध्ये नाविन्यपूर्ण, उत्कृष्ट आणि संशोधन आधारित शिक्षण उपक्रम सुरु झाले आहेत. या उपक्रमाचा उद्देश शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करणे आणि शिक्षकांना अत्याधुनिक डिजिटल साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे आहे.या कार्यक्रमासाठी शाळेतील ४० विद्यार्थी आणि शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. सर्व सहभागी शिक्षकांना मायक्रोसॉफ्ट तसेच इतर आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या पुढाकारामुळे शाळेतील शिक्षण अधिक आधुनिक व विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील स्पर्धेसाठी सक्षम करण्यात येईल.

वाढत्या तंत्रज्ञानाच्या व स्पर्धेच्या युगात या उपक्रमाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे व एबीएम इंग्लिश हायस्कूल ही जिल्ह्यातील अशी एकमेव शाळा आहे की जी आंतरराष्ट्रीय स्तरावरील तंत्रज्ञान आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना देत आहे यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व भविष्यातील उज्वल कामगिरी करण्याकडे त्यांचे पहिले पाऊल पडलेले आहे त्यात ए.बी.एम. इंग्लिश हायस्कूलचा अत्यंत मोलाचा वाटा आहे यामधून विद्यार्थ्यांना टेक अवांत गार्ड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना मोफत लॅपटॉप देण्यात येणार आहे, या कंपनीच्या अंतर्गत दरवर्षी ४० विद्यार्थ्यांची निवड या विशेष अभ्यासक्रमासाठी करण्यात येईल. यातून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच शाळेसाठी हेल्थ कियोस्क तंत्रज्ञान मिळणार आहे, पुढचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उन्हाळी सुट्टीत सुसज्ज इंटरशिप कार्यक्रम ही राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी हे नव्या तंत्रज्ञानाशी आपले नाते अत्यंत मजबूत करणार आहेत. त्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी शाळेतूनच अत्यंत सज्ज करण्यात येईल शाळेच्या या उल्लेखनीय पुढाकाराबद्दल संपूर्ण हिंगोली जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची ओमप्रकाश देवडा बँकेला भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**



राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी नुकतीच शहरातील ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेला सदीच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा यथोचीत सत्कार करण्यात आला.

यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा यांच्यासह संचालक मंडळाची उपस्थिती होती. बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांनी बँकेविषयी थोडक्यात माहीती दिली. तसेच सहकार क्षेत्रातील अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष प्रकाशचंद सोनी यांनी केले. यावेळी मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्व ओमप्रकाश देवडा यांच्यासोबतचे सहकार क्षेत्रातील अनुभव सांगतांना भाऊ सहकार क्षेत्रातील आदर्श व्यक्तीमत्व होते व माझे व त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. बँकेची नवीन इमारत ओम भवन ही एक अत्यंत सुसज्ज आणि नावीन्यपूर्ण प्रशस्त इमारत असून सहकार एक नाव लौकीक करणारा केंद्रबिंदू या शहरात अस्तित्वात आला आहे, असेही बाबासाहेब पाटील यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमास बँकेचे संचालक विठ्ठलदास मुंदडा, शशीकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, संजय देवडा, राजेश अग्रवाल, गजानन देशमुख, अजित बज, आशिष काबरा, राजु मुदीराज, संचालक मारोतराव बुद्रुक, कमलकिशोर बगडीया, नवनीत राठौर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, सरव्यवस्थापक शशीकांत कंदी, श्रीमती समता अग्रवाल, उपसरव्यवस्थापक सुधीर मुळ, सह सरव्यवस्थापक श्रीराम माळोदे, ज्ञानदेव घुगे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# प्रशासनाप्रती विश्वास निर्माण करणे मोठी बाब– अभिनव गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ एप्रिल**



हिंगोली जिल्ह्यात जेमतेम ७ महिने काम करण्याची संधी लाभली. त्या कार्यकाळात हिंगोलीवासीयांच्या मनात जिल्हा प्रशासनाप्रती विश्वास निर्माण करता आला, ही मोठी बाब असल्याची भावना मावळते जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी निरोप समारंभात व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित निरोप आणि स्वागत समारंभात श्री. गोयल बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नूतन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, श्रीमती शुभी अभिनव गोयल, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, तहसीलदार अश्विन माने यावेळी उपस्थित होते.

या जिल्ह्यात काम करताना काही बाबींचा, प्रसंगांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल, असे सांगून त्यांनी अतिवृष्टी व कयाधू नदीला आलेल्या पूरपरिस्थितीबाबतची आठवण सांगितली. या जिल्ह्यात काम करताना निपुण हिंगोली, संजिवनी अभियान, कृषि, आरोग्य, शिक्षण विभागात काम करता आले. हिंगोली जिल्ह्यात शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रक्षेत्र भेटी दिल्यामुळे हिंगोलीकरांसोबत चांगली नाळ जुळली असल्याचे सांगून, आपण कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत असलो तरीही हिंगोली आणि हिंगोलीकर कायम हृदयात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच कधीही तिकडे आल्यास हिंगोलीकरांसाठी त्यांच्या घराचे दरवाजे उघडे असल्याचे सांगताच सभागृहाचे वातावरण भावूक झाले होते.

नोकरी म्हटले की बदली आलीच, त्यामुळे जिथे आहोत, तिथे आपल्या कामाची छाप सोडायची. नेतृत्वाने केवळ फॉलोअर्स न वाढवता नेतृत्व वाढवायचे ते विकसित करायचे असते, असे मावळते जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध विकासकामांचा आवर्जून उल्लेख करत जिल्हा न्यायालयाची इमारत, वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय महाविद्यालयाकडे झालेले हस्तांतरण यांचा उहापोह केला. तसेच येथील कामकाजाचा मोठा अनुभव भविष्यात वरिष्ठ पातळीवर धोरणनिश्चिती करताना नक्कीच कामी येईल, असे सांगून जिल्हा प्रशासनातील अधिकारी–कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि माध्यमकर्मींचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

यावेळी स्वागत समारंभात नूतन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मावळते जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचे राहिलेले कामकाज त्याच गतीने पूर्ण करण्याचा विश्वास व्यक्त करताना धाराशिवमध्ये असताना त्यांच्या अनेक नाविन्यपूर्ण बाबींचे अनुकरण केले असल्याचे सांगितले. हिंगोलीच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना, उपक्रम तितक्याच ताकदीने यशस्वीरित्या पुढे नेत राबविण्यात येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा ग्रामीण यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, जयाजी पाईकराव, संजय टाकळगव्हाणकर यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वन विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

# वन मजुरांऐवजी चक्क जेसीबी मशीनचा वापर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ एप्रिल-**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे असे ब्रीदवाक्य असलेले वन विभागाचे सध्या वन विभागाला विसर पडलेला दिसते. नांदेड जिल्ह्यातील क्षेत्रफळ दृष्टीने सर्वात मोठा तालुका म्हणून हदगाव तालुक्याची गणना होत आहे. तसेच भौगोलिक दृष्टीने हदगाव तालुक्यातील जंगलव्याप्त वाढलेला आहेतच. मात्र हदगाव तालुक्यातील वन विभागाचा अजभ गजब कारभार चालू आहे. आंधळा दडतय कुत्रा पीठ खातय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हदगाव वनपरिक्षेत्र कार्यालय सध्या या ना त्या कारणाने प्रसिद्ध आहे. उपवनसंरक्षक नांदेड वरिष्ठ अधिकारी डोळेझाक वृत्तीमुळे व तसेच हदगाव वनपरिक्षेत्र अधिकारी विजय कटके व अमोल जिंकलवाड यांच्या दबंगगिरी मुळे हदगाव वनविभाग चर्चेत आले आहे.



हदगाव तालुक्यातील मौजे हाळेगाव- माळेगाव निवघा बा येथील जंगलातील वन बीट मध्ये सलग समतल पातळी वन मजुराच्या वतीने करावयास हवे होते. परंतु या ठिकाणी चक्क जेसीबी मशीनच्या साह्याने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच् दंडेलशाही मुळे या ठिकाणी जेसीबी मशीन वापरल्या जात आहे. या जेसीबीच्या मशीनच्या आवाजामुळे जंगलातील वन्यप्राणी सैरावैरा होत आहेत. गेल्याच आठवड्यात हदगाव वनपरिक्षेत्र अंतर्गत दोन हरणाचा व दोन रानडुकरांचा मृत्यू झाला होता. या जेसीबीच्या आवाजामुळे वन्य प्राणी सैरावैरा होऊन इकडे तिकडे व मानवी वस्तीत गेली आहेत व इतर ठिकाणी अपघात होऊन ठार झाले आहेत. तसेच या मशीनमुळे जंगलातील मोठाली उंच झाडे या मशीनमुळे कत्तली करण्यात आली आहेत. हदगाव वनपरिक्षेत्र अंतर्गत अनेक उदाहरणे आहेत. या क्षेत्रातील विविध प्रजातीच्या शेकडो वृक्षांची कत्तली करण्यात आली आहेत. अशी सूत्रांकडून माहिती मिळाली आहे. या संदर्भात आमच्या प्रतिनिधीने भ्रमणध्वनी माहिती विचारण्या करण्यासाठी फोन केला असता संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे नेहमी भ्रमणध्वनी नॉट रिचेबल राहत आहे. मागील काही दिवसांमध्ये लावलेली वृक्षांची रोपे ती या जेसीबीच्या मशीनच्या खोदकामामुळे नाश पावली आहे. हदगाव वनपरिक्षेत्र अंतर्गत तामसा ,मनाठा, लोहा पाटी, केदारगुढा, या उपक्षेत्रांचा समावेश होतो. मागील काही वर्षांपासून या परिसरातील अवैध वृक्षतोड अवैध उत्खनन. सर्रासपणे चालू आहे. इतकंच नाही तर जमिनीवर अवैध अतिक्रमण ही पण वाढले आहेत. मात्र यावर अंकुश लावण्यासाठी वन विभागाला अपयश आले आहे.

## आटाळा गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा ; महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष ?

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि.२९ एप्रिल-**

येथून जवळच असलेल्या धर्माबाद तालुक्यातील आटाळा गोदावरी नदीपात्रातून पाच ते सहा इंजिन व अनेक तराफ्यांच्या साहायाने अवैध वाळू उपसा सुरु असताना संबंधित महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने या वाळू माफियां विरोधात आर्थिक लाभासाठी कारवाई करत नसल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान काळात गोदावरी नदी पात्रातून वाळू उपसा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्याप



लिलाव केला नाही मात्र आटाळा - उमरी परीसरातील काही वाळू माफीया भाऊच्या नावाखाली रात्री-बेरात्री तसेच दिवसाढवळ्या गोदावरी नदी पात्रातून वाळू उपसा करण्याचा सपाटा लावला असून ते नदीच्या पाण्यातून तराफ्याच्या सहायाने नायगांव तालूक्यातील राहेर व बिलोली तालूक्यातील कोळगाव हद्दीत देखील घुसखोरी करत वाळू उपसा करण्याचा सपाटा चालवला आसल्याचे दिसून येत आहे . या अवैध वाळू उत्खननामुळे शासनाचा लक्षावधी रुपयाचा महसूल बूडत आहे. त्यामुळे धर्माबादच्या महसूल विभाग व पोलीस प्रशासनडून आर्थिक लाभापोटी कारवाई करण्यात येत नाही तेव्हा जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी लक्ष घालून अटाळा येथील वाळू माफिया, धर्माबाद चे संबंधित महसूल विभागाचे अधिकारी व पोलीस यांच्यावर लक्ष घालून ठोस कारवाई करावी अशी मागणी सर्व सामान्य जनतेतून होत आहे.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आज महानाट्य

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त दिनांक ३० एप्रिल रोजी विजय नगर मैदान येथे चले हम प्रबुद्ध भारत की ओर या महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रद्धेय भिक्खू विनयबोधिप्रिय उपस्थित असणार आहेत.

मूलगंध कुटी बुद्ध विहार तथागत नगर , संबोधी बुद्ध विहार पाली नगर , विश्वशांती बुद्ध विहार वैशाखी पौर्णिमा नगर आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुयायी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे.

## स.देवेंद्रसिंघ रतनसिंघ गल्लीवाले हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ एप्रिल-**

श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी येथील प्रयोगशाळा परिचर या पदावरील स.देवेंद्रसिंघ रतनसिंघ गल्लीवाले हे दिनांक ३० एप्रिल रोजी नियतवयोमानाने प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.



विष्णुपुरी येथील श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था येथील प्रयोगशाळा परिचर या पदावर दिनांक २८ मे १९९२ रोजी नियुक्ती झाली होती. नियतवयोमानाने दि. ३० एप्रिल २०२५ रोजी ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त समई ते यंत्र अभियांत्रिकी विभा गातुन सेवानिवृत्त झाले. यापूर्वी ते वाहन विभागामध्ये प्रोडक्शन विभागात काम करत होते. यापूर्वी ते ८८ते ९० या वर्षात बजाज वाळूज औरंगाबाद कंपनीत वाहन चालकाचे काम करत असताना वाहनाचे आवरेज जास्तीत जास्त देत होते म्हणून त्यांना बजाज कंपनी वाळूज औरंगाबाद तर्फे पुरस्कारही देण्यात आला होता.सदरील सेवानिवृत्ती बद्दल अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी यांनी सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या या सेवानिवृत्ती बद्दल महाविद्यालयातील संचालक डॉ. मनेश कोकरे यांच्यासह अनेकांनी पुढील आयुष्य हे निरोगी व आनंदी राहावेत यासाठी शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त वृत्त

### ऊसतोड कामगारांच्या समस्येवर चर्चा करण्यासाठी बुधवारी आढावा बैठक

**नांदेड**-ऊसतोड कामगारांच्या प्रलंबित विविध समस्येवर विशेष चर्चा करण्यासाठी बुधवार ३० एप्रिल २०२५ रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय येथे सकाळी ९.३० वा. नांदेड येथील न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश दलजीतजी कौर जज यांनी आढावा बैठक बोलावली आहे. जिल्ह्यातील ऊसतोड कामगार, मुकादम, ऊस वाहतूकदार, अपघाती मयत ऊसतोड कामगारांचे जे वारस असतील त्यांना याची नोंद घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. या बैठकीला तुळजाभवानी ऊसतोड कामगार संघटनेस सामाजिक न्याय विभाग नांदेड यांच्यावतीने निमंत्रित करण्यात आले आहे. या बैठकीचे आयोजन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नमस्कार चौकाजवळ ग्यानमाता शाळेसमोर नांदेड येथे करण्यात आले आहे. संबंधित सर्वांनी या बैठकीस ३० एप्रिल रोजी सकाळी ९.३० वा. जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत करण्यात आला आहे. या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोरील मुख्य रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय ते महात्मा गांधी पुतळा ते महाविर चौक पर्यंतच्या परिसरातील मुख्य रोडवर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी २९ एप्रिल २०२५ रोजीचे ००.०० वाजेपासून (२८ एप्रिल २०२५ चे मध्यरात्री २४.०० वाजेपासून) ते ३ मे २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चे, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे. संबंधीतावर नोटीस बजावून त्यांचे म्हणने ऐकूण घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश निर्गमीत करण्यात आला आहे, असेही आदेशात नमूद केले आहे.




**हदगाव- दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चि. सुजल सुशीलकुमार देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त व १ मे महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनानिमित्त दि.२९ एप्रिल रोजी श्री. सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी ता. हदगाव येथे ४२ तर शिऊर सा. का. लि. वाकोडी ता. कळमनुरी येथे ११९ रक्तदात्यांनी रक्तदान केले दरवर्षी दोन्ही कारखान्यात दि.१८ नोव्हेंबर रोजी श्री. सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी व शिरूर सा.का. वाकोडी चे कार्यकारी संचालक सुशीलकुमार सुभाषराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त ही दरवर्षी रक्तदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.**

## आनंद देवकत्ते ठरला वंडगीर गावचा पहिला एमबीबीएस डॉक्टर



**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि.२८ एप्रिल-**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथून जवळच असलेल्या वंडगीर या छोट्याशा गावातील अभिषेक आनंदराव देवकत्ते (पाटील) हा वंडगीर गावचा पहिला एमबीबीएस डॉक्टर बनला. कष्टाच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. त्याचे वडील शेतकरी व आई गृहणी आहे. त्याच्या या यशामागे त्याचे आई-वडील व मामा,मामी तसेच त्याचे संपूर्ण कुटुंब यांचे ही त्याला सहकार्य लाभलेले आहे . अभिषेक चे शिक्षण पहिली ते सातवी छत्रपती संभाजी विद्यालय मुक्रमाबाद व आठवी ते दहावी विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर या ठिकाणी झाले आहे. अकरावी व बारावी दयानंद कॉलेज लातूर येथे झाले आहे. कोविड काळात सुद्धा सर्व क्लासेस बंद असताना घरीच अभ्यास करून त्यांने जिद्दीने व मेहनतीने कष्ट करून चइइडची तयारी चालू ठेवली. व त्याला शासकीय मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल संभाजीनगर येथे त्याचे एमबीबीएस ला सलेक्शन झाले.त्याच्या या यशाबद्दल शुक्रवार दि.२५ रोजी गावाकऱ्यांनी येथोचित्त सत्कार केला तसेच त्याची बहीण स्नेहा भाऊ ओमकार व भाऊजी शेखर यांनी ही अभिषेक चे भरभरून कौतुक केले.

## आ. केराम यांच्या रेट्यामुळे शारदा कन्स्ट्रक्शन व सुनील हायटेकला बजावल्या नोटीसा !

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२९ एप्रिल**

धनोडा येथील पैनगंगा नदीवरील पुलाचे अर्धवट काम तसेच सरसम ते कोठारी या राष्ट्रीय महामार्गावर काम पूर्ण होण्यापूर्वी भेगा पडल्या असून संदर्भात आमदार भीमराव केराम यांनी निवेदन सादर करून कार्यवाही करण्याची मागणी करताच राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाच्या सहाय्यक अभियंत्याने शारदा कन्स्ट्रक्शन व सुनील हायटेक इंजिनिअर या दोन्ही एजन्सीला नोटीसा बजावल्या आहेत.राष्ट्रीय महामार्गावरील भेगा दुरुस्ती व धनोडा येथील पुलावरील रेलिंग व खड्डे बुजवण्याचे काम तात्काळ हाती घेऊन सात दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



किनवट शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ चे काम पूर्ण होण्यापूर्वीच बहुतांश ठिकाणी रस्त्यावर

### राष्ट्रीय महामार्गावर भेगा, धनोडा पूल निकृष्ट

भेगा पडल्या आहेत तर धनोडा येथील पैनगंगा नदीवरील पुलाचे रेलिंग व खड्डे भरण्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे.या राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट व निकृष्ट कामाबद्दल नागरिकाकडून वारंवार रोष व्यक्त केला गेला. दरम्यान आमदार भीमराव केराम यांनी यासंदर्भात नागरिक व वाहनधारकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडे निवेदन सादर करून रस्त्याची स्थिती निदर्शनास आणून देत काम करणाऱ्या एजन्सीवर कारवाई करण्याची मागणी केली.त्यांच्या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन भोकर येथील राष्ट्रीय महामार्ग उपविभाग कार्यालयाच्या सहाय्यक अभियंत्याने सुनील हायटेक इंजिनिअर्स नागपूर तसेच शारदा कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड नांदेड यांना नोटीस बजावली असून सरसम ते कोठारी पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या काही भागांमध्ये भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे काम पूर्ण होण्याच्या अल्पावधीतच असे दोष दिसणे ही गंभीर चिंतेची बाब असल्याचे नमूद करत सर्व लहान आणि मोठ्या भेगांची सखोल तपासणी करून दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले आहेत तर धनोडा येथील पुलाचे रेलिंग नाही ज्यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठा धोका निर्माण होतो. या व्यतिरिक्त पुलाच्या पृष्ठभागावरील खड्डे अधिक धोकादायक ठरत आहेत. कामांच्या अंमलबजावणी बाबत सूचना देऊनही सदर काम निकृष्ट व तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याचे नमूद करत पुलाचे रेलिंग बसवण्याचे काम व पृष्ठभागावरील सर्व खड्डे आवश्यक मानांकानुसार भरून सात दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत तर किनवट शहरातील रस्त्याचे काम वेळेवर आणि समाधानकारक पद्धतीने सुरू न केल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

## नवसाला पावणाऱ्या चक्री येथिल मारुती रायाचरणी ३ लाखाची हळद अर्पण



**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि.२९ एप्रिल-**

हादगाव तालुक्यातील हदगाव-बाळापुर राष्ट्रीय मार्गावर असलेल्या मौजे चक्री येथील नवसाला पावणाऱ्या हनुमंत राया चरणी तीन लाख रुपयाची हळद अर्पण करण्यात आली विलास शंभाजी शिंदे हळद अर्पण करणाऱ्या दानशूर व्यक्तीच नाव आहे.

हादगाव तालुक्यासह महाराष्ट्रभर मौजे चक्री येथिल नवसाला पावणारा मारुती म्हणुन प्रसिद्ध असलेल्या मारुतीराया चरणी गावातील अल्पभूधारक शेतकरी विलास संभाजीराव शिंदे या सदभक्ताने गत वर्षी हनुमंतराया चरणी आपल्या मनातील मनोकामना पूर्ण व्हावी यासाठी नवस बोलला होता बोललेला नवस मनोकामना पूर्ण झाल्याने त्यांनी या वर्षी रामनवमी व हनुमान जयंती निमित्त आयोजित सप्ताहात आपल्या एक एकर शेतात जेवढे हळद पीक होईल तेवढे मारुतीराया चरणी अर्पण करू असा शब्द गावकऱ्यांना दिला होता आज सोमवार दि. २९ एप्रिल रोजी समस्त गावकरी मंडळी चक्री यांना आमंत्रित करून चक्री येथील दानशूर व्यक्तिमत्व विलास संभाजीराव शिंदे यांनी नवसाला पावणाऱ्या मारुतीराया चरणी २४ क्विंटल हळद अंदाजे किंमत तीन लाख रुपये मारुतीराया चरणी अर्पण केली यावेळी समस्त गावकरी मंडळी चक्री यांच्या वतीने गावातील दानशूर व्यक्तिमत्व विलास संभाजीराव शिंदे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला यावेळी संभाजी शिंदे,रमेश शिंदे, योगेश शिंदे, सुनील शिंदे व समस्त गावकरी मंडळी चक्री उपस्थित होते.

**भक्तांच्या संख्येत लक्षणीय वाढ**

नवसाला पावणारा मारुती म्हणून हादगाव तालुक्यासह महाराष्ट्रभर ख्याती असलेल्या मौजे चक्री येथील मारुतीराया चरणी बोललेले नवस पूर्ण होत असल्याने मौजे चक्री येथे मारुतीरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले आहे. येथे येणारे भक्त नोकरीसाठी, पुत्र प्राप्तीसाठी, व्यवसायात यश मिळवण्यासाठी, निवडणुकीत विजय प्राप्तीसाठी, विवाह योग जुळून येण्यासाठी व मनातील इतर मनोकामना पूर्ण व्हाव्यात याकरिता येथील मारुतीराया चरणी दर्शन घेऊन नवस बोलतात व बोललेली मनोकामना नवस पूर्ण झाला की येथील मारुतीराया चरणी अभिषेक करून भरघोस देणगी, नगर भोजन, सोने चांदी मारुती चरणी अर्पण करतात असेही येथिल ग्रामस्थांनी सांगितले आहे.

## हिमायतनगर नगरपंचायतीवर

# पाण्यासाठी मोर्चा



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२९ एप्रिल-**

नगरपंचायतीच्या चुकीच्या नियोजनामुळे शहरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, या प्रशासनाच्या विरोधात सोमवारी संतप्त झालेल्या महिलांनी घागर मोर्चा काढला.

शहरातील अनेक बोअरवेल बंद पडले आहेत. काही बोअर पाणी असून, मोटरपंप बंद पडले आहेत. अधिग्रहण केलेल्या बोअरवरून पाणीपुरवठा होत नसल्याने पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागत आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेकडो महिलांनी पाणी द्या, पाणी द्या, म्हणत नगरपंचायतीवर घागर मोर्चा काढून दोन तास ठिय्या मांडून आंदोलन केले. बंद पडलेल्या बोअर सुरू होण्यासाठी

धरणातून टेंभुर्णी मार्गे कॅनॉलद्वारे पैनगंगा नदीत पाणी सोडण्याची मागणी केली. दरम्यान, किनवटकडे जाणारे मंत्री इंद्रनील नाईक यांना महिलांनी निवेदन देऊन पाणीटंचाईचे संकट दूर करावे, यासाठी साकडे घातले. शहरातील बहुतांश प्रभागातील पाणी समस्या गंभीर बनलीआहे. परीनामी १९ कोटी ६० लाख रुपये किमतीची पाणीपुरवठा योजना राजकीय पुढारी, गुत्तेदार यांच्या मनमानी कारभारामुळे कुचकामी ठरली आहे. त्यामुळे शहरातील पाण्याची समस्या बनली आहे.

## हाणेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**हाणेगाच, दि.२९ एप्रिल-**

हाणेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही परमपूज्य विश्वरत्न भारतरत्न महामाणव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती समाज मंदीर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहे.

सर्वप्रथम भगवान गौतमबुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पुजन



करुन प्रितम देशमुख यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यांत आले यानंतर बुद्ध वंदना घेण्यात आली.यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश देशमुख व प्रमुख पाहुणे म्हणून प्रितम देशमुख,विवेक पडकंठवार,हज्जुसेठ चमकुडे,दिलीप बंदखडके,मुजीप चमकुडे,विश्वनाथ चलवे,नारायन सावरगावे ,यादव सुर्यवंशी,बालाजी संतपुरे,डॉ. शेरीकार,मुक्तार पटेल,हारुण कोटग्याळे,रामदास बैलवाड,महाधव नामेवार,अशोक पटने,नरेश चौधरी आदीजन यावेळी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अतीश आडेकर यांनी केले तर आभार विलास भंडारे यांनी मानले. यावेळी संध्याकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेची भव्य मिरवणुक काढुन कार्यक्रमाची सांगता करण्यांत आली यावेळेस नवयुवक भिमजयंती मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## टी. सी. हरवली

माझी शेख अजहर शेख बाबू या नावाची इयत्ता ७ वी पासची टी. सी. नांदेड ते मुदखेड प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**
**शेख अजहर शेख बाबू**
**आसरा नगर नांदेड**
**मो. ८६६८८४७४०४**

संक्षिप्त

## १० मे रोजीराष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**जालना /प्रतिनिधी** - जिमाका, दि.२९ : उच्च न्यायालय, मुंबई व मा. महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार दिनांक १० मे, २०२५ रोजी जिल्हा वसत्र न्यायालय, जालना येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.या लोक अदालतीचाजास्तीत जास्त लोकांना फायदा व्हावा या उद्देशाने लोक अदालत बाबतची माहिती वप्रसिध्दी घरा-घरा पर्यंत पोहचावी या उद्देशाने व लोकांनी जास्तीत जास्त प्रकरणेलोक न्यायालयाच्या माध्यमातून निकाली निघावे या हेतुन राष्ट्रीय लोक अदालतीचेआयोजन करण्यात आले आहे.लोक अदालतीमध्ये आपली जास्तीतजास्त प्रकरणे ठेवावी यासाठी विधिज्ञ, पक्षकार व शासनाच्या विविधविभागांनी/अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,जालना वर्षा एम. मोहिते व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना प्रणिता पी.भारसाकडे-वाघ यांनी केले आहे.

## 'आपदा मित्र' प्रशिक्षणासाठी नोंद करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**जालना /प्रतिनिधी** , जिमाका, दि.२९ : राज्यातील २० जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या Up scaling apda MitA°a या योजनेचे यश विचारात घेऊन उर्वरित १६ जिल्ह्यात 'आपदा मित्र'प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास दिनांक ९ ऑगस्ट २०२४ रोजीचे शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत जालना जिल्ह्यामधून एकूण ३०० आपदा मित्रांना (स्वयंसेवक) आपत्ती व्यवस्थापन विषयाबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आपदा मित्रांत नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थीनी NCC/NSS विद्यार्थी, छत्रब्ज, आशा, पोलिस पाटील, कोतवाल, अंगणवाडी सेविका, होमगार्ड, पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बल, खाजगी सुरक्षा रक्षक, शासकीय/निम शासकीय कर्मचारी यांचा समावेश करण्यात येणार आहे.

सहभागी होणा-या प्रशिक्षणार्थीना १२ दिवसाचे निवासी प्रशिक्षण, वैयक्तिक आपत्कालीन प्रतिसादकर्ता संच (एठघ), ३ वर्षाकरिता ५ लाखाचे विमा संरक्षण राज्य शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदरील कीट आपदा मित्र प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

आपदा मित्र निवड निकष सदर व्यक्ती हि भारताची नागरिक असावी व संबंधित जिल्ह्यातील रहिवासी असावी. सदर व्यक्ती हि शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावी. वयोमर्यादा १८ ते ४५ वर्ष (माजी सैनिक, डॉक्टर, स्थापत्य अभियंता, शास्त्रज्ञ, आपत्कालीन सेवेतून सेवानिवृत अधिकारी व कर्मचारी यांना आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करून घेता येईल त्याकरिता वयोमर्यादा ५५ वर्षे असेल मात्र त्यांना विमा सुरक्षा देता येणार नाही.) आपदा मित्र प्रशिक्षणामध्ये किमान ३५% महिलांचा सहभाग असणे आवश्यक आहे.

जालना जिल्ह्यातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपत्ती व्यवस्थापनामध्ये ''आपदा मित्र (आपत्कालीन परिस्थितीत मदत करणारा स्वयंसेवक) म्हणून स्वेच्छेने प्रशिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीने आपत्ती शाखा क्रिस्ताविकारी कार्यालय जालना अथवा आपल्या नजीकच्या तहसील कार्यालय येथे नाव नोंदणी करावी.

## हज यात्रेकरुंचे लसीकरण व आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**जालना /प्रतिनिधी**, जिमाका, दि.२९ : हज यात्रा २०२५ साठी जाणाऱ्या हज यात्रेकरुंचे लसीकरण व आरोग्य तपासणी दि. ५ मे, २०२५ रोजी सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत बी.एस्सी. नर्सिंग विद्यालय जिल्हा रुग्णालय परिसरात करण्यात येणार आहे. तरी हज यात्रेसाठी जाणाऱ्या हज यात्रेकरुंनी लसीकरण व आरोग्य तपासणी करीता येतांना त्यांचे आधार कार्ड व पासपोर्टची छायांकित प्रत व यात्रेकरुना काही आजार असल्यास त्याची औषधोपचाराची संपुर्ण कागदपत्रे सोबत आणण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# व्यापारी महासंघातर्फे जालना क्रेडाई पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**व्यापार व उद्योग क्षेत्रातील समस्यांवर व्यापारी महासंघ व क्रेडाई एकत्रितपणे काम करणार-विनीत साहनी**



**तभा वृत्तसेवा**

**जालना /प्रतिनिधी** : जालना जिल्हा व्यापारी महासंघातर्फे क्रेडाईचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सचिव चेतन मराठे, उपाध्यक्ष अविनाश भोसले आणि कोषाध्यक्ष सिद्धांत शर्मा आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थानी जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी हे होते. व्यासपीठावर सत्कारमूर्तींसह व्यापारी महासंघाचे महासचिव श्याम लोया यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात विनीत साहनी यांनी व्यापारी महासंघाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. व्यापार क्षेत्रातील समस्यांचे निरसन, व्यापाऱ्यांच्या हितासाठी करण्यात आलेले प्रयत्न आणि महासंघाच्या कार्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. बदलत्या जागतिकीकरणाच्या काळात व्यापार व उद्योग क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या समस्यांवर व्यापारी महासंघ व क्रेडाई एकत्रितपणे काम करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत त्यांचा सन्मान केला. सत्काराला उत्तर देताना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार म्हणाले की, क्रेडाई संघटना बांधकाम व्यावसायिकांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करणार आहे. व्यावसायिकांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासह कामगारांच्या आरोग्य आणि कौशल्यविकासावर विशेष भर देण्यात येणार आहे. शासनाने जालना शहर व जिल्ह्याच्या विकासासाठी आगामी ५० वर्षांचा आराखडा तयार करण्यासाठी गोखले इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेची नियुक्ती केली आहे. या आराखड्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि व्यावसायिकांच्या अपेक्षांची मांडणी करण्यासाठी क्रेडाई व व्यापारी महासंघ एकत्रितपणे चर्चेचे व्यासपीठ उभारणार आहे. यासाठी व्यापारी महासंघाच्या सहकार्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली व सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानले.

प्रास्ताविकपर भाषणात शाम लोया यांनी व्यापारी महासंघाच्या कार्याचा आणि विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी क्रेडाई संघटनेच्या देशभरातील कार्याची माहिती उपस्थितांना दिली. क्रेडाई ही देशातील सर्वांत मोठी बांधकाम व्यावसायिकांची संघटना असून, बांधकाम क्षेत्राच्या विकासासाठी व व्यावसायिकांच्या प्रश्नांवर काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी व्यापारी महासंघाचे कोषाध्यक्ष विजय राठी, कार्याध्यक्ष बंकटलाल खंडेलवाल, दिलीपभाई शहा, विजय सुराणा, विजय बगडिया, राजेश कामड, विनोद पवार, ईश्वर बिल्लोरे, प्रमोद गंडाळ आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद पवार यांनी केले.



**तभा वृत्तसेवा /प्रतिनिधी**

**'सीएमआयए २०२५' सस्टेनबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन पुरस्कार मिळाल्या बद्दल कालिका स्टील चे संचालक उद्योजक घनश्यामदास गोयल यांचा भारतीय जनता पक्षाच्या वतीने सत्कार करण्यात आला याप्रसंगी जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे,उद्योजक अर्जुन गेही, महानगर प्रमुख सतीश जाधव, नविन जालना मंडळ अध्यक्ष सुनील खरे, सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, अशोक पांगारकर ,गोवर्धन कोल्हे, कृष्णा गायके, नागेश अंभोरे, विकास कदम आदी उपस्थित होते.**

## महाराष्ट्र राज्याच्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने '' गड किल्ले माती व नद्या- जलकुंभ '' यात्रा

**तभा वृत्तसेवा**

**जालना /प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याच्या दिनांक एक मे रोजी च्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव- २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्त मराठवाड्यातील जिल्हा हिंगोली, नरसी नामदेव येथून यात्रेस दिनांक २८ एप्रिल २०२५ वार सोमवार रोजी सुरूवात झाली आहे. महाराष्ट्रातील गड किल्ले माती व नद्याचे जल कुंभ यात्रा म्हणून या कार्यक्रमास सुरुवात झाली आहे. सदरील यात्रा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून प्रस्थान करणार आहे. या यात्रेचे दि. ३० एप्रिल २०२५ बुधवार रोजी सायंकाळी ५.०० वाजता जालना जिल्ह्यात आगमन होणार असून यावेळी जालना येथे यात्रेचे स्वागत व शहरातून फेरी काढण्यात येणार आहे. यात्रा जालना शहरातील अंबड चौफुली -जिल्हा राष्ट्रवादी कार्यालय - मंठा चौफुली- शिवाजी पुतळा- पाणीवेस मंमादेवी- गांधी चमन - छत्रपती संभाजी उद्यान (मोतीबाग) मार्गे जिल्हा छत्रपती संभाजीनगर कडे प्रस्थान करणार आहे.

यावेळी यात्रेसोबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश पदाधिकारी, मंत्री, आमदार व विविध जिल्हयातील जिल्हाध्यक्ष यांची उपस्थिती राहणार आहे. तरी जालना जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या वर्धापनदिनानिमित्त निघालेल्या गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ आयोजित यात्रेचे स्वागत व फेरी मध्ये मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे.

# डॉ. पुरुषोत्तम वायाळ, बालाजी ढोबळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**परतूर /प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर येथील समर्थ सेवा समुहाच्या वतीने तालुक्यातील वाटूर येथील प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ व परतूर येथील पत्रकार बालाजी ढोबळे यांना ' मराठवाडा भूषण समर्थ गौरव ' हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

जलतारा हा महत्वाकांक्षी प्रकल्प प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणण्याचा कसोशीने प्रयत्न करत असल्याबद्दल प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांना तर बालाजी ढोबळे यांना वर्तमानपत्राच्या माध्यमातून सातत्याने प्रेरणादायी व लोकोपयोगी तसेच सकारात्मक वृत्तलेखनाचा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.

येत्या १ मे रोजी महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित एका कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.





दरवर्षी आमच्या संस्थेच्या वतीने उत्कृष्ट व समाजोपयोगी कामे करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाही महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

**- दत्ता ठुबे, अध्यक्ष, समर्थ सेवा समूह, छत्रपती संभाजीनगर.**



## मौलाना आझाद आर्थिक महामंळाची घनसावंगीत आठावा बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**घनसावंगी :** मौलाना आझाद आर्थिक महामंडळाचे संचालक व राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र उपाध्यक्ष अजित दादा गट व राष्ट्रीय अध्यक्ष मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन सलीम जी सारंग साहेब व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मुस्लिम वेल्फेअर असोसिएशन रमीज शेख महाराष्ट्र राज्य आढावा बैठक दौरा घनसावंगी येथे पार पडला ह्या कार्यक्रमाचे अध्यक्ष अन्सार बशीर शेख यांच्या उपस्थित पार पडला मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनचे जिल्हा युवक जिल्हाध्यक्ष अजित सय्यद जालना जिल्हा कार्याध्यक्ष महमूद शेख सर्वच कार्यकर्ते उपस्थित होते नसीर शेख सलमान पठाण निहाल शेख इरफान शेख युसुफ खान अक्षय शेजुळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## गळ्यातील सोन्याचे गंठण, मोबाईल आणि ९०००/- पलवणारे चोरांना ४ किलोमीटर पाठलाग करून दैठणा शिवारात शिताफीने पकडले, परतूर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**परतुर /प्रतिनिधी** दिनांक २२/४/२५ रोजी सायंकाळी साडेसात वाजता चे सुमारास फिर्यादी नामे दत्ता आसाराम ठाकरे रा. सेवगा ता. परतूर हे साई बाबा चौक चे समोर रोडवर मोटार सायकल उभी करून फोन वर बोलत असताना २ मोटार सायकल वर ४ चोर आले व फिर्यादी यांना धामधूम करून त्याचे हातातील मोबाईल आणि खिशातील ९०००/- जबरदस्तीने हिसकावून घेऊन पळून गेले होते, तसेच त्यानंतर थोड्या वेळाने फिर्यादी नामे सौ. शीतल संतोष अर्दाड रा. राजा टाकली या आपले नातेवाईक यांचे लग्नाला रोडणे पाई साई बाबा चौक कडे जात असताना जैन मंदिरा समोर रोडवर २ मोटार सायकल वर ५ चोरटे आले आणि त्यांचे गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावून आणि धकाबुक्की करून घेऊन गेले होते, ही घटना समजताच एम. टी. सूरवसे, पोलिस निरीक्षक पो स्टे परतूर यांनी तत्काळ दखल घेऊन दोन्ही गुन्हे नोंद करून तत्काळ चक्रे फिरवून २ आरोपी नामे १) मोहन शेषेराव चौहान वाय २८ वर्ष, २) सागर प्रल्हाद पवार वाय ३२ वर्ष दोन्ही रा. पारधीवाडा परतूर हे दहिटना शिवारात असल्याची माहिती मिळाली असता त्यांचा ऊसाचे शेतात ४ कीमी पटलाग करून २ आरोपी पकडले मात्र अजून ३ पळून जाण्यात यशस्वी झाले, पकडलेल्या आरोपीस अटक केली असून त्यांचे ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले २ मोटार सायकल, हिसकावून घेऊन गेलेला मोबाईल आणि किशातील नागदी ९०००/- असा एकूण १,१६, ०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बाकी मुद्देमाल चा शोध घेणे चालू आहे. सदरची कारवाई मा. श्री अजय कुमार बंसल साहेब, पोलीस अधीक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपानी साहेब , अप्पर पोलिस अधीक्षक साहेब, मा. श्री. दादाहरी केशव चौरे साहेब, ड्रझज परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी सुरवसे, पोलिस निरीक्षक, पो स्टे. परतूर, पोहेका/ रामदास फुपाटे , पोहेका/ अशोक गाडवे, पोका/दीपक आडे, पोका/अच्युत चौहान, पोका/सतीश जाधव, पोका/ गोविंद पवार, पोका/ सुनील पवार, पोका/ राम हाडे, पोका/ परमेश्वर माने, चालक पोका/ स्वप्निल फंड, पोका/ वंदन पवार, पोका/ नरेंद्र चौहान. यांनी केली आहे.



# भाजप जिल्हाध्यक्ष पदाची निवडणूक पारदर्शी आणि लोकशाही मार्गाने पार पडेल: राहुल लोणीकर

**लातूर शहर जिल्हाध्यक्ष पदासाठी राहुल लोणीकर यांनी जाणून घेतली पक्ष पदाधिकाऱ्यांची मते; आमदार निलंगेकर, आमदार कराड, चाकूरकर यांच्यासह अनेकांनी व्यक्त केल्या भावना भाजपा निष्ठावान कार्यकर्त्यांना निश्चितपणे बळ देईल**

**- राहुल लोणीकर**

**तभा वृत्तसेवा**

**जालना/प्रतिनिधी** : भारतीय जनता पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी इच्छुक उमेदवारास प्रथमच वयाची अट व इतर निकष लागू करण्यात आले आहेत तसेच निवड प्रक्रियेतही मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. जिल्हाध्यक्ष पदासाठी ४५ ते ६० अशी वयाची अट लागू करण्यात आली आहे. नवीन पक्षप्रवेश झालेल्या कार्यकर्त्याचा जिल्हाध्यक्ष पदासाठी विचार केला जाणार नाही तसेच आमदार किंवा खासदाराचीही जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती होणार नाही, असे नवे निकष लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्रभर या नवीन निकषानुसार निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली असून भाजप लातूर शहर जिल्हाध्यक्ष पदाची निवडणूक पारदर्शी आणि लोकशाही मार्गाने पार पडेल असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा लातूर शहर जिल्हा भाजपा निवडणूक निरीक्षक श्री राहुल लोणीकर यांनी केले. भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडी संदर्भात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीसाठी भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांना पक्ष निरीक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली होती या बैठकी प्रसंगी माजी मंत्री



आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार रमेश कराड, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, दत्तराव कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष देविदास काळे, माजी जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे शैलेश लाहोटी, मनपा विरोधी पक्षनेते शैलेश गोजमगुंडे, अजित कव्हेकर, प्रेरणा होनराव, दत्ता चेवले, रवी केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपने यंदा हे वर्ष संघटन पर्व म्हणून जाहीर केले आहे. सदस्य नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मंडलाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया सध्या सुरू आहे. जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवारास वयाची अट लागू करतानाच इच्छुक उमेदवाराने यापूर्वी संघटनेत जबाबदारीच्या पदावर काम केलेले असावे, दोन टर्म सक्रिय सदस्य असलाच पाहिजे, महिला- एससी-एसटी यांची नावे मंडल पातळीवरून आली पाहिजेत. अनुशासित व प्रामाणिक व्यवहार करणारा असावा, असे निकष लागू केले आहेत. पूर्वी निवड प्रक्रिया प्रदेश पातळीवर नियुक्त केलेल्या निरीक्षकांमार्फत इच्छुकांच्या मुलाखत घेऊन राबवली जात होती. मात्र आता मुलाखती टाळण्यात आल्या आहेत. त्याऐवजी संघटनेत काम करणाऱ्या ठरावीक पदाधिकाऱ्यांना शिफारस करण्यास सांगण्यात आले आहे, याची यादीही निवडणूक निरीक्षकांना प्रदेशकडून दिली गेली आहे. ही शिफारस करताना इच्छुक कसा पात्र आहे, हे प्रपत्रात नमूद करायचे आहे. असेही राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्हाध्यक्ष पदासाठी तेथील रहिवासी असलेले राष्ट्रीय व प्रदेश पदाधिकारी, प्रदेश कोअर ग्रुप सदस्य, विभाग संघटन मंत्री, मोर्चाचे पदाधिकारी, राज्यसभा व लोकसभेचे खासदार, माजी खासदार, आमदार, माजी आमदार, विधानसभा लढलेले उमेदवार, विद्यमान जिल्हाध्यक्ष, माजी जिल्हाध्यक्ष जिल्हा सरचिटणीस, प्रकोष्ट पदाधिकारी, प्रवासी कार्यकर्ते यांना शिफारस करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. संघटना चालवण्यासाठी अनुभवी कार्यकर्ता असावा, यातून हे निकष लागू करण्यात आले असून या नव्या निकषामुळे निष्ठावानांना नक्की न्याय व बळ मिळेल असेही यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले.यावेळी रवी सूडे प्रदीप मोरे मीनाताई भोसले दिग्विजय काथवटे शिरीष कुलकर्णी प्रवीण सावंत गणेश गोमचाळे रागिणी यादव निखिल गायकवाड दुर्गेश चव्हाण यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे आजी व माजी मंडल अध्यक्ष, युवा मोर्चा महिला आघाडी अल्पसंख्यांक आघाडी चे जिल्हा व मंडल स्तरावरील पदाधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोबाईल चोरणाऱ्या दोन तरूणांना स्थानिक गुन्हे शाखेने पकडले

## दहा मोबाईल व मो.सा. असा २,८७,०००/- रु चा मुद्देमाल केला जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ एप्रिल**

फिर्यादी अभिषेक दिनकर केदार वय २० व्य.शिक्षण रा.संतज्ञानेश्वर नगर यांनी पो.स्टे.शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, दि.११/०४/२०२५ रोजी रात्री ०९.१५ वा. सुमारास पिंपरगव्हाण रोड, गायत्री दुकानाच्या जवळ रोडवरुन घरी फोनवर मित्राला बोलत चालत जात असतांना पाठीमागुन काळया रंगाच्या स्प्लेंडर मोटार सायकलवर तिघेजण आले व त्यातील एका अज्ञात इसमाने माझा मोबाईल हिसकावुन घेवुन ते तिघे तेथुन निघुन गेले. वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गु.र.नं.२१०/२०२५ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हयाची दि.१२/०४/२०२५ रोजी नोंद करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा उकल करण्याचे दृष्टीकोणातुन मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले. त्यावरुन पो.नि. स्था.गुशा.बीड यांनी आपले अधिपत्याखालील पोउपनि सुशांत सुतळे व त्यांचे पथकाला गुन्हयाचे उघडकीस आणण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांची गोपनिय यंत्रणा सतर्क करुन दिनांक २८/०४/२०२५ रोजी स्थागुशा पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, दोन इसम हे बीड शहरातुन वेगवेगळया ठिकाणाहुन मोबाईल हिसकावुन चोरुन नेलेले मोबाईल विकणेकामी समर्थ मंगल कार्यालय समोर ते अहिल्यानगर जाणाऱ्या रोडवर येणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तेव्हा सदर माहिती पो.नि. स्था.गु.शा. यांना देवुन त्यांनी तत्काळ पुढील कारवाई करणेचे आदेश दिल्याने स्थागुशा पथक बातमी ठिकाणी जावुन तेथे सापळा लावला असता एक मोटार सायकलवर दोन इसम आल्याचे दिसुन आले तेव्हा त्यांचेकडे जात असतांना त्यांनी तेथुन मो.सा.वर पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांना पथकाने पकडुन त्यांची नावे विचारली असता १) आदित्य बंकट नरवडे वय १९ वर्षे रा.बालेपीर ता.जि.बीड, २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे वय १९ वर्षे रा.ईट ता.जि.बीड असे सांगितले. मोबाईल हिसकावुन चोरी केलेल्या घटनांबाबत बारकाईने विचारपुस केली असता आदित्य नवडे व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी मिळुन मो.सा.वर जावुन मो.सा.वर जावुन मोबाईल बोलत चालत असलेल्या लोकांचे मोबाईल हिसकावुन चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १० रिअल मी, सॅमसंग अल्ट्रा, रिअल मी, विवो, ओपो, पो.को.



कंपनीचे मोबाईल व गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण २,८७,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपींकडुन खालील नमुद उकल करण्यात स्था.गु.शा.पथकाला यश आले आहे.

१) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं २१०/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं.

२) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं १६५/२०२५ कलम ३०४(४) भा.न्या.सं.

३) पो.स्टे.बीड शहर गुरनं ४०/२०२५ कलम ३०३(२), भा.न्या.सं.

४) पो.स्टे.बीड शहर गुरनं ६७/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं.

सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असुन १) आदित्य बंकट नरवडे रा.बालेपीर व २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे यांना पो.स्टे.शिवाजीनगर,बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन मोबाईल चोरीचे आणखीन इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्तता आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे.

सदरची कामगिरी श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक बीड, श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे पोह/मारुती कांबळे, पोह/विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, देविदास जमदाडे, पोशि/ नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

# परळी रेल्वे स्थानकावर RPF कडून देखरेख आणि सखोल तपासणी






**प्रवाशांना सतर्कतेचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ एप्रिल**

दि.२८ एप्रिल २०२५ रेल्वे स्थानकांवरील सुरक्षेचा स्तर अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने परळी रेल्वे स्थानकावर रेल्वे सुरक्षा दल (RPF) कडून मंगळवारी व्यापक प्रतिबंधात्मक तपासणी व कडक देखरेख मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेंतर्गत पार्सल कार्यालय, गाड्यांच्या डबे, स्थानक परिसर तसेच प्रवाशांच्या गर्दीच्या ठिकाणी तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान संशयास्पद हालचालींवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. प्रवाशांना कोणतीही संशयास्पद किंवा गुन्हेगारी कृती निदर्शनास आल्यास त्वरित माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

ही तपासणी निरीक्षक एस.बी.कांबळे आणि उपनिरीक्षक किशोर मलकूनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे पार पडली. त्यांच्या नेतृत्वाखाली RPF च्या पथकाने अत्यंत दक्षतेने स्थानक परिसराची झडती घेतली.रेल्वे सुरक्षा दलाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, प्रवासादरम्यान आपली सामानाची काळजी घ्यावी, अनधिकृत व्यक्तींशी व्यवहार टाळावा आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ RPF किंवा स्थानक अधिकाऱ्यांना कळवावे.रेल्वे सुरक्षा दल प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी आणि रेल्वे मालमत्तेच्या संरक्षणासाठी सदैव कटिबद्ध आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

# बाराव्या शतकातील लिंगायत क्रांतीचे जनक महात्मा बसवण्णा यांनी समाजात समतेची बीजे पेरली: प्रा.राजु कोकलगावे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ एप्रिल**



बाराव्या शतकातील लिंगायत क्रांतीचे जनक महात्मा बसवण्णा यांनी समाजात समतेची बीजे पेरली, असे मत प्रा.राजू कोकलगावे यांनी व्यक्त केले. तर बसवेश्वरांच्या अनुभव मंटपातील वचनांचा अनुवाद झाल्यास त्यांचे साहित्य जगभर पोहोचू शकेल, असे सामाजिक कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांनी प्रतिपादन केले.

ते परळी वैजनाथ येथे महात्मा बसवेश्वर यांच्या ९२० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. महात्मा बसवण्णांनी पेरलेल्या समतेच्या बीजांमुळे समाजात महत्त्वपूर्ण बदल झाले. लिंगायत धर्माला मानणारा वर्ग हा एक मोठा आणि प्रभावी समुदाय बनला, ज्याने सामाजिक समानतेच्या मूल्यांना महत्त्व दिले. त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ त्या काळापुरता मर्यादित नव्हता, तर आजही तो आपल्याला जाणवतो. सामाजिक न्याय आणि समानतेसाठी लढणाऱ्या अनेक चळवळींना त्यांच्या कार्यापासून प्रेरणा मिळाली आहे. अनुभव मंटपातील वचनांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक ज्ञानच नाही तर सामाजिक सुधारणा आणि मानवी मूल्यांचाही महत्त्वपूर्ण संदेश आहे. जर या साहित्याचा योग्य प्रकारे अनुवाद करून जगभरात प्रसार केला गेला असता तर ते निश्चितच अखिल मानवजातीसाठी एक अनमोल ठेवा ठरू शकला असता आणि जगभरातील लोकांना अधिक उन्नत जीवनाची दिशा दाखवू शकला असता.

# भारतीय जनता पार्टीच्या परळी शहर अध्यक्षपदी उमाताई समशेट्टे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ एप्रिल**



भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्षपदी माजी नगरसेविका उमाताई समशेट्टे यांची निवड करण्यात आली आहे. राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हा अध्यक्षांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या निवडी जाहीर केल्या.

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक निवडी प्रक्रिया राज्यभरात चालू आहे. या अंतर्गत शनिवार दि २६ एप्रिल रोजी बीड जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीच्या मंडळ अध्यक्षांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. परळी शहराध्यक्ष पदी भाजपा जेष्ठ नेत्या उमाताई चंद्रकांतअप्पा समशेट्टे यांच्या नावाची निवड करण्यात आली आहे. दोन वेळा परळी शहरातील वेगवेगळया विभागातून उमाताई समशेट्टे परळी नगरपरिषदेवर निवडून आलेल्या आहेत. राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या निकटवर्तीय म्हणून ओळख असलेल्या उमाताई समशेट्टे राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक व धार्मिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

**देशातील सामाजिक सलोखा अबाधित राखण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ एप्रिल**

देशातील जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम अतिशय सुंदर पर्यटन स्थळ असून, काही दिवसांपूर्वी येथील पर्यटकांवर दहशदवादी हल्ला झाला. यावेळी या हल्ल्यात तब्बल २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. सदरील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या भारतीयांना श्रद्धांजली अर्पण पर कार्यक्रम काँग्रेसचे जेष्ठ विचारवंत हरिभाऊ सोळंके यांच्या पुढाकारातून शहरातील ठक्कर बाजार येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सदरील कार्यक्रमात चळवळीतील जेष्ठ नेते कॉ. मुसद्दीक बाबा सर, जेष्ठ नेते दयानंद स्वामी, जेष्ठ नेते बाबुराव पोटभरे, आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद यादव, राष्ट्रीय काँग्रेसचे नारायण होके, राष्ट्रीय काँग्रेसचे दत्ता कांबळे, मनोहर डाके, ऍड. याकूब मेमन,अभय होके, धम्माणंद साळवे,श्रीहरी मोरे, रशीद शेख, अफरोज तांबोळी सह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी उपस्थित सर्वपक्षीय




नेत्यांच्या भाषणातून सदरील हल्ल्याचा सामना करण्यासाठी प्रथम आणि शेवटी भारतीय म्हणून आपण देशातील सरकार सोबत ठाम पणे उभा असून, भारत सरकारने जशाच तसे उत्तर द्यावे तसेच देशातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी भारत सरकार सह देशातील प्रत्येक नागरिकांनी सहकार्य करावे असे एकमुखी आवाहन यावेळी उपस्तित सर्वपक्षीय नेत्यांनी यावेळी केले आहे.

# अंबानगरीत श्री गजानन विजय ग्रंथाचा तीन दिवशीय सामुदायीक पारायण सोहळ्याचे अयोजन

**काल्याचे कर्तन, दिपोत्सव व महाप्रसादाने होणार सांगता**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ एप्रिल**

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे अयोजन ७ मे ते १० मे दरम्यान सकाळी ७ ते१० या वेळेत शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आहे.त्याची सांगता शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर पालखी उत्सव,महाआरती,महाप्रसाद 'सत्संग श्री गजाननाचा' व श्रींची दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता करण्यात येणार आहे. या पारायण सोहळ्यास व विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादासाठी अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहन संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हभप. वै. दत्तात्रय जोशी महाराज नळेगावकर यांच्या कृपा अशीर्वादाने गेली १२ वर्षापासून श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे व भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन आयोजन केले जात आहे. प्रति वर्षाप्रमाने याही वर्षी ७ मे ते १०मे २०२५ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आसुन सोहळ्याचे हे १३वे वर्ष आहे.तीन दिवशीय पारायण सोहळा प्रमुख हभप.आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ७ ते१०च्या वेळेत पारायण सोहळा पार पडणार आहे.पारायण सोहळा कार्यक्रमा दरम्यान पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती सकाळी श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण,सांप्रदायी भजण,भक्ती संगीत,कु. दिपाली रघुनाथराव कुलकर्णी परतुर, प्रसाद महाराज कुलकर्णी जवळबनकर यांचे किर्तन होणार आहे.९ मे रोजी गण गण गणात बोतेच्या गजरात टाळमृंदगाचा टेकाधरत धाकटे



देवघर,कुत्तर विहर, पाटील चौक, जयवंती पुल, साई गणेश मंदीर, खोलेश्वर मंदीर, चौभारा गल्ली, गौंड गल्ली मार्गे धाकटे देवघर येथे पालखी पोहचणार आहे.१० मे रोजी शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर महाआरती व महाप्रसाद,सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ संचलित, 'सत्संग श्री गजाननाचा' व श्रींची दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता उत्सहात करण्यत येणार आहे.पारायण सोहळा, विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादाचा अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहान संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भगवान परशुरामांनी शस्त्र व शास्त्राचा वापर मानव कल्याणासाठी केला-अश्विन मोगरकर



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ एप्रिल**

भगवान विष्णूंचे सहावे अवतार भगवान परशुरामांनी शस्त्र व शास्त्राचा वापर मानव कल्याणासाठी केला असल्याचे प्रतिपादन अश्विन मोगरकर यांनी भगवान परशुराम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात केले.गणेशपार भागातील सावळाराम मंदिर येथे भगवान विष्णूंचे सहावे अवतार भगवान परशुराम यांच्या जयंती मंगळवार, २९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना अश्विन मोगरकर यांनी भगवान परशुराम यांच्या दैवी अवतारावर बोलताना पुढे सांगितले की, फक्त ऋषी म्हणून शास्त्र हाती एव्हढेच नव्हे तर गरज पडली तर शस्त्र हाती घेऊन भगवान परशुरामांनी अत्याचारी राजांना हरवून निशस्त्र केले. मानव कल्याणासाठी उन्मत्त सत्ताधार्यांनी जनतेवर केलेल्या अत्याचाराविरोधात शस्त्र हाती घेतले. प्रारंभी भगवान परशुरामांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी विजय जोशी, धनंजय आढाव, पद्माकर शहाणे, विरकुमार स्वामी, राजेश कौलवार, बालकृष्ण फुले, श्रीपाद चौधरी, गुरुनाथ हालगे, सत्यनारायण मानधने, राहुल पाचेगावकर, लहू हालगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विजय जोशी यांनी केले.

# सोन्याला लाखाची झळाळी

भारताच्या सराफ बाजारात सोन्याने लाखाचा टप्पा ओलांडला असून ऐन लग्नसराईत सर्वसामान्यांचे कंबरडे मोडणार हे निश्चित.जगाच्या पाठीवर सर्वात जास्त सोन्याचे दागिने वापरणारा एकमेव देश भारत आहे. लग्न समारंभ, अक्षय तृतीया, पाडवा, दीपावली, गुरुपुष्यामृत, अशा महत्त्वाच्या सणांना व तिथींना भारतात सोने खरेदी करणे हे शुभ मानले जाते. प्रथम लोहयुग त्यानंतर ताम्र युग व नंतर सुवर्णयुग निर्माण झाले.



इसवी सन पूर्व ३००० मध्ये सोने या धातूचा शोध लागला असे मानले जाते. भारतातील अनेक वैभवशाली राजांच्या कारकिर्दीत सुवर्णयुग होते असा उल्लेख आढळतो मग तो गुप्त कालखंड असो का मौर्य कालखंड असो, अनेक राज्यांनी आपल्या चलनात सोन्याची नाणी प्रचलित केली. या सोन्याच्या हव्यासापोटीच परकीय आक्रमकांनी भारत भूमीवर पाय ठेवले. व प्रचंड लूट केली. भारतातील अनेक मंदिरे सोन्याने मढविली होती असा उल्लेख सुद्धा आढळतो. त्यापैकी काही मंदिरांमध्ये आजही सुवर्ण धातू आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंहासन ३२ मण सोन्याचे होते असा उल्लेख आढळतो. यावरून असे लक्षात येते की भारतीय लोकांना पूर्वीपासूनच सुवर्ण धातूचे प्रचंड आकर्षण व वेड आहे. तसेच सुवर्ण अलंकार हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले गेले. भारतातील विवाह समारंभ म्हटला की सुवर्ण अलंकारा याशिवाय पूर्णच होत नाही. हे लक्षात घेऊन सर्वात मोठी उलाढाल सुवर्ण धातूत आहे हे लक्षात घेऊन सरकार, शेअर बाजार, घाऊक व्यापारी व किरकोळ व्यापारी यांनी दिवसेंदिवस सोन्याच्या दारात प्रचंड वाढ केली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० साली सोन्याचा भाव प्रतितोळा ९९ रुपये होता,१९६० मद्ये १११ रु,१९७० मध्ये १८४ रु.१९८० मध्ये १३३० रु,१९९० मध्ये ३२०० रु,२००० मध्ये ४४०० रु,२०१० मध्ये १८५०० रु,२०२० मध्ये ४८६५१ रु,२०२४ मध्ये ७५०००, आणि आज एप्रिल २०२५ मध्ये सोन्याचा भाव प्रतितोळा एक लाख ११६ रुपये असा झाला आहे. सोन्याचा भाव लक्षात घेता २०२० सालापासून सोन्याने सराफा बाजारात उसळी घेतल्याचे लक्षात येते. संपूर्ण भारतातील सोने वापरणाऱ्या भारतीयांची आवड व पसंती लक्षात घेऊन प्रचंड लूट चालवलेली आहे. सोन्याच्या पाठोपाठ चांदीच्या किमती सुद्धा गगनाला भिडत आहेत.

सोन्यावरील जी एस टी दर त्याच्या मूल्याच्या ३ टक्के आहे.(१.५ टक्के उत्रब्ध +१.५ टक्के ) साधारणपणे एक लाखाच्या सोने खरेदीवर ३००० रुपये हा कर लागतो.

केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या सोने व्यापाऱ्यावर लावलेला सी जी एस टी आणि एस जी एस टी चा फटका सोने व्यापारावर लादू नये म्हणून या व्यापाऱ्यांनी तब्बल वर्षभर सोन्याची दुकाने बंद ठेवली होती.अमेरिकेने भारतात पाठवण्यात येणाऱ्या वस्तूंवर २६ टक्के टॅरीफ आकारला आहे. ज्यामुळे भारतात सोने महागले आहे. तर मोदी सरकारने अमेरिकेतून भारतात येणाऱ्या सोन्यावर सहा टक्के सीमाशुल्क आकारले आहे. तसेच जी एस टी सी जी एस टी तीन टक्के जो सोन्याच्या एकूण मूल्यावर लागू होतो. या कारणांमुळे भारतात दिवसेंदिवस सोन्याच्या किमती वाढत चाललेल्या आहेत.

भारतात सर्वाधिक सोने स्वित्झर्लंड, युनायटेड अरब अमिराती, युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स, दक्षिण आफ्रिका, आणि रशिया या देशातून निर्यात केले जाते.

ऑस्ट्रेलिया, बहारीन आणि ण-ए ही भारतीय सोन्याची निर्यात करणारी महत्त्वाची बाजारपेठ होती. जागतिक निर्यातीपैकी अंदाजे ३.५% भारतातील हिरे आणि दागिने बनतात. युनायटेड स्टेट्स, युनायटेड अरब अमिराती आणि युनायटेड किंगडम हे सर्वोच्च आयातदार असल्याने, भारत जगभरातील १५३ पेक्षा जास्त राष्ट्रांना सोन्याचे दागिने निर्यात करतो.

भारतातील सोन्याच्या निर्यातीचा शोध घेतला असता बाजारातील ट्रेंड आणि भविष्यातील शक्यता लक्षात घेतली तर २९ ऑक्टोबर, २०२४ नुसार प्रमुख

देशानुसार सोन्याच्या निर्यातीच्या आकडेवारीवर आधारित, २०२३-२४ मध्ये, भारतातून रत्ने आणि सोन्याच्या दागिन्यांची निर्यात २२.२७ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी झाली, जी मागील वर्षाच्या तुलनेत १४.९४% कमी आहे.

जगातील सर्वात मोठा सोन्याचा निर्यातदार स्वित्झर्लंड आहे, ज्याने २०२३-२४ मध्ये ८६.७ अब्ज डॉलर्स किमतीचे सोने आणि सोन्याचे दागिने निर्यात केले.

भारतातील आघाडीचे सोन्याचे दागिने निर्यातदार म्हणजे राजेश एक्सपोर्ट्स, नॅशनल इंडिया बुलियन रिफायनरी एसीए, हीरा गोल्ड एक्सपोर्ट्स अँड इम्पोर्ट्स, चेन एन चेन्स आणि हिरा गोल्ड एक्सपोर्ट्स अँड इम्पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड.

सोने निर्यात करणाऱ्या देशांमध्ये स्वित्झर्लंड, युएई, युनायटेड किंग्डम, अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि रशिया यांचा समावेश आहे.

सोने ही भारतीयांसाठी एक मौल्यवान वस्तू आहे. सोन्याचे दागिने घालण्याचा आनंद घेण्यासोबतच, भारतीयांना उत्पन्न मिळवण्यासाठी या मौल्यवान धातूमध्ये गुंतवणूक करणे देखील आवडते. निर्यातीच्या बाबतीत, भारताची सोन्याची निर्यात १४६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त होती. तसेच, जगभरातील एकूण निर्यातीपैकी भारतातील रत्ने आणि दागिन्यांचा वाटा सुमारे ३.५% आहे.

भारतात सोने उत्पादन किती होते तर

२०२३-२०२४ या आर्थिक वर्षात भारतात अंदाजे १,३४१ किलो सोन्याचे उत्पादन झाले होते. २०१९-२० मध्ये उत्पादित झालेल्या १,७४२ किलो सोन्याच्या तुलनेत ही घट आहे.

जरी ते सामान्य पातळीवर केले जात असले तरी, भारतात सोन्याच्या खाणीचा इतिहास मोठा आहे.

भारतातील सोन्याचे उत्पादन गेल्या काही वर्षांत बदलत राहिले आहे, २०२२ मध्ये ते १,२००,००० किलोग्रॅमच्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले आणि २००० मध्ये ६,२००,००० किलोग्रॅमच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचले होते.

भारतातील सोन्याचे सर्वाधिक उत्पादन कर्नाटकात होते. भारतातील ८० टक्के सोने कर्नाटकात उत्पादित होते. आपण त्याला 'सोन्याची भूमी' म्हणतो.

भारतातील सर्वात मोठ्या सोन्याच्या खाणी, ज्या भारतातील उत्पादित होणाऱ्या सोन्यापैकी सुमारे ८०% सोने उत्पादित करतात, त्या हुट्टी गोल्ड माइन्स आणि कोलार गोल्ड फील्ड्स (KGF) आहेत. दोन्ही खाणी कर्नाटकात आहेत, ज्यामुळे कर्नाटक भारतातील सर्वात मोठे सोने उत्पादक राज्य बनले आहे.

सोनभद्र सोन्याच्या खाणी, रामगिरी सोन्याचे क्षेत्र, पारासी सोन्याची खाण, गदग सोन्याची खाण आणि चिगरगुंटा-बिसनाथम सोन्याची खाण भारतातील इतर प्रमुख खाणी आहेत.

भारतातून सोन्याची निर्यात फायदेशीर आहे का?

खरंच, जगभरात भारतीय दागिन्यांना जास्त मागणी असल्याने भारतातून सोन्याची निर्यात फायदेशीर ठरू शकते असा अंदाज आहे.

भारतातील सोन्याची वाढती मागणी लक्षात घेता, भारतातून सोने निर्यात करण्याचा व्यवसाय सुरू करणे ज्यामध्ये बार, नाणी आणि दागिने विकले जातात, हा एक फायदेशीर व्यवसाय कल्पना आहे. तथापि, भारतातील सोने निर्यात बाजारात प्रवेश करण्यासाठी, विविध परवाना निकष, बाजार कामगिरी मानके आणि इतर महत्त्वाच्या पूर्व-आवश्यकता पूर्ण करणे आवश्यक आहे.

भारतातील सोन्याच्या निर्यातीबद्दल नवीनतम डेटा मिळवून आणि धातूच्या खऱ्या खरेदीदारांशी संपर्क साधून व्यापारी आणि कंपन्यांनी बाजारपेठ तीव्र स्पर्धात्मक आहे याची खात्री करणे आवश्यक आहे

सोन्याची शुद्धता:

२४घ सोने:

शुद्ध सोन्याला २४घ सोने म्हणतात, ज्यामध्ये ९९.९% सोने असते.

२२घ सोने:

२२घ सोन्यात ९१.६७% सोने आणि ८.३३% इतर धातू (उदा. तांबे, चांदी) असतात, ज्यामुळे ते २४घ सोन्यापेक्षा अधिक टिकाऊ असते.

सोन्याची किंमत:

सोन्याची किंमत अनेक घटकांवर अवलंबून असते, जसे की सोन्याची शुद्धता, जागतिक मागणी आणि चलन.

गुंतवणूकीसाठी सुवर्ण धातू ऐवजी पर्याय निवडला तर

भारतात अनेक प्रकारच्या धातूंचे दागिने सराफा बाजारात तयार केले जातात त्यामुळे सोन्या ऐवजी पर्यायी धातूचा वापर भारतीयांनी करून सोन्याच्या वाढत्या किमतीला आळा घालता येईल का असा विचार केला पाहिजे. किंवा लग्न समारंभात सुवर्ण धातू ऐवजी रोख रक्कम जर वधू-वरांना प्रदान केली तर त्यांच्या प्रपंचाला हातभार निश्चितच लागेल हा विचार केला पाहिजे. तसेच रियल इस्टेट ,शेती,प्लॉटींग,शेअर बाजारात गुंतवणूक करता येईल असे त्यामध्ये अनेक पर्याय शोधता येतील का असा विचार भारतीयांनी केला तर सोन्याच्या किमती नियंत्रित राहतील.

**ज्ञानेश मातेकर**
**अंबाजोगाई**

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com